# भीतीचे सावट

कथासंग्रह



अक्षय पोवार

# भीतीचे सावट

( कथासंग्रह )

**अक्षय पोवार**

ई साहित्य प्रतिष्ठान

# **भीतीचे सावट** (कथासंग्रह)

## लेखक : अक्षय पोवार

28-442, पंचारती सोसायटी, चारकोप सेक्टर 04, कांदिवली पश्चिम, मुंबई उपनगर, 400067.

संपर्क : 9136843413

ई-मेल : powarakshay01@gmail.com

वेबसाईट : https://akshaykhajina.blogspot.com

फेसबुक : www.facebook.com/akshaykhajina

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

# ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,
ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे, महाराष्ट्र, भारत
400604

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

## प्रकाशन : २० मार्च २०२६



©esahity Pratishthan®2026

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# प्रस्तावना



नमस्कार..

माझं नाव अक्षय आहे. सध्या मी साहित्यक्षेत्रात लेखक म्हणून कार्यरत आहे.

माझं प्राथमिक शिक्षण मुंबईत "आदर्श विद्यालय", गोरेगाव येथे झालं आहे. माध्यमिक शिक्षण "पाराशर हायस्कूल पारगांव", कोल्हापूर येथे झालं आहे. "इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हिल ॲण्ड रूरल इंजिनिअरिंग", गारगोटी या संस्थेतून मी मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा पूर्ण केला आहे. त्याचबरोबर "यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ" येथून राज्यशास्त्र हा विषय घेऊन मी माझं पदवीच शिक्षण पूर्ण केलं आहे.

वाचता वाचता निर्माण झालेली लेखनाची आवड मला साहित्यक्षेत्राकडे घेऊन आली. सध्या मी "ॲमेझॉनवर" तसेच "अक्षय खजिना" या ब्लॉगवर नवनवीन कथा-कादंबऱ्या प्रकाशित करत आहे. आत्तापर्यंत माझ्या चार कादंबऱ्या आणि एक कथासंग्रह प्रकाशित झालेला आहे.

त्यातील पहिली कादंबरी “सखी” ही एक रोमँटिक थ्रिलर प्रकारातील आहे. तर दुसरी कादंबरी “आरशातलं प्रेम” ही एका अव्यक्त प्रेमाची रहस्यकथा आहे. तिसरी कादंबरी “अधुरी कहाणी” ही आजच्या तरुणाईच्या लग्न मानसिकतेवर आधारीत आहे. काळाच्या पलीकडे जाऊन कर्मचक्र समजाऊन सांगणारी “अदृश्य बाप” ही कादंबरी  टाईम ट्रॅव्हल संकल्पनेवर आधारित आहे.

आपल्याच माणसांकडून मिळणाऱ्या वेदना या डोळ्यांना दिसत नाहीत, अशाच काही कथा "अदृश्य वेदना" कथासंग्रहात आहेत.

“भीतीचे सावट” हा कथासंग्रह “ई-साहित्य प्रतिष्ठान” या संस्थेमार्फत प्रकाशित होत आहे याचा आनंद आहे. ई-साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना यातील कथा आवडतील अशी आशा आहे.

पुस्तकांच्या अक्षय खजिन्यात आपलाही एखादा मोती चमकावा म्हणून सुरू असलेला हा एक प्रयत्न !

धन्यवाद.

*प्रस्तुत केलेल्या कथा काल्पनिक असून त्यांचा कोणत्याही वास्तव घटनेशी किंवा जिवंत अथवा मृत व्यक्तीशी संबंध नाही.*

# अनुक्रम

प्रोफेसर

अखेरचा निरोप

मूर्तिकार

पाठीराखा

# प्रोफेसर

बारा वाजत आले होते तरी रेश्मा अन् मनिषा अजून झोपूनच होत्या. सकाळची दोन लेक्चरं चुकणार याची त्यांना रात्रीच खात्री झाली होती.

आता हे नेहमीच झालं होतं. सकाळी लेक्चर असलं की ते हमखास चुकत होत. त्याला कारणही तसं होत. रात्रभर दोघी भीती पोटी जाग्याच असायच्या. धडकी भरवणारे विचित्र आवाज थांबले की त्यांचा डोळा लागायचा अन् त्यांना थेट अकरा-बारा वाजताच जाग यायची.

खरं तर ही खोली भाड्याने घेऊनच त्यांची चूक झाली होती. दोघींची इच्छा होती की कॉलेजपासून आणि गावापासून जरा लांब खोली असली की मनासारखं राहता येतं. पण आता राहणं तर दूर त्यांना जगताच येत नव्हतं.

कारण, त्या दोघी ज्या ठिकाणी राहत होत्या तिथे रात्री अपरात्री चित्र विचित्र आवाज ऐकू येत होते. दूरवर कोणी तरी रडत असल्याचा भास होत होता. भयाण शांततेत कुत्री ओरडण्याचा आवाज येण, वाऱ्याचा आवाज येण इथपर्यंत ठीक होत. पण एक बाई रडण्याचा आवाज त्यांना सहन होत नव्हता. तो आवाज त्यांना शांत बसू देत नव्हता. मिनिटा मिनिटाला त्यांची भीती वाढवत होता.

याबद्दल त्यांनी घर मालकाकडे तक्रार केली होती पण त्याने दुर्लक्ष केलं होत. तुम्हाला भास होत असतील असं सांगून तो हात झटकत होता.

या दोघींचा सुद्धा नाईलाज होता. त्या खोली सोडून जाऊ शकत नव्हत्या. खूप शोध घेतल्यानंतर त्यांना मनासारखी खोली मिळाली होती. अन् ही खोली हातातून जाऊ नये म्हणून त्यांनी आधीच सहा महिन्याच भाडं दिलं होतं. त्यामुळे पुढचे सहा महिने आपण आता निवांत राहू शकतो असं त्यांचं नियोजन होत.

परंतु हे रात्री अपरात्री येणारे आवाज ऐकून त्या भीतीने थरथरू लागल्या होत्या. याबद्दल आता कोणाला सांगायचं हे देखील त्यांना कळत नव्हत.

आसपास कोणाला विचारायला जावं तर दोन घरामधलं अंतर दिड एक किलोमीटर तरी होतं. इथं घरं तर होती पण राहणारी माणसं फार कमी होती.. क्वचितच एका दुसऱ्या घरात माणसं आढळायची ती पण दिवसा.. रात्री माणूस दिसणं म्हणजे अवघड.. अन् महत्वाचं म्हणजे, दोघींची खोली गावापासून लांब.. निलगिरीच्या जंगलात..

खोलीच्या आसपासचा भाग झाडांनी वेढलेला. नारळीची झाडं, आंब्याची झाडं.. दिवसा इथला निसर्ग हवाहवासा वाटायचा तर रात्रीचा तो भयावह व्हायचा.

दारावरची बेल वाजू लागली तशा दोघी जाग्या झाल्या. मनिषाने उठून दरवाजा उघडला. समोर तिची मैत्रीण होती.

"अजून झोपलायसा..?" मधुने डोळे मोठे करून विचारलं.

मनिषा काहीच न बोलता मागे फिरली. मधु जोरजोरात मान हलवत घरात शिरली.

मधूला आलेल पाहून रेश्मा उठून बसली. मनिषा वॉशरुमच्या दिशेने गेली.

"रेश्मे डोकं हाय का जाग्याव..?" रेश्मा शांत बसून होती. ती अजूनही घाबरली होती.

"काय झालंय काय दोघींस्नी. येत का नाही तुम्ही तासाला..?" मधु प्रश्नार्थक चेहऱ्याने तिला विचारत होती.

"मधु अगं पुन्हा आवाज ऐकू येत होते. रात्रभर तेच सुरू होतं. माझं बाळ मला द्या.. माझं बाळ द्या. माझं बाळ द्या. एकच आवाज आणि रडणं." रेश्मा घाबरत घाबरत बोलत होती.

"तुम्हांला म्हणत होते मी, इथून तो पडका वाडा फार जवळ आहे. वाड्याजवळ कुठली खोली घेऊ नका. ती जागा बरोबर नाही. पण तुम्ही काय ऐकलं नाही माझं. बसा आता. घ्या मनासारखी खोली." मधु चिडून बोलत होती. रेश्मा चिंतेत होती.

"ए ऽ मधे, उपाय सांगणार अश्शील तर बोल उगाच आमच्यावर राग काढू नकोस." मनिषा टॉवेलने हात पुसत बोलू लागली.

"आता उपाय एकच यावर. प्रोफेसरांना भेटा. त्यांना सांगा."

"त्यांना काय सांगू. त्यांचा इथे काय संबंध..?" रेश्मा तिला नजर देत विचारू लागली.

"पप्पा म्हणत होते पूर्वी ही जागा प्रोफेसरांची होती. त्यांच्या बाबांनी नंतर ही विकायला काढली अन् तुमच्या घरमालकाने विकत घेतली."

"त्यांना सांगून करायचं काय.. आता ही जागा त्यांची कुठ आहे..?"

"होय खरंय. त्यांची नाही आता. पण मित्र त्यांचाच आहे. तुमच्या घरमालकाचा बा आणि प्रोफेसरचा बा मित्र होते. त्यांचा पोरगा म्हणजे प्रोफेसर आणि तुमचा घरमालक मित्रच आहेत. त्यांच्या कानावर घाला."

"मला नाही वाटत घरमालक त्यांचं ऐकेल म्हणून." मनिषा ओठ चुचकारत बोलू लागली. "त्याला आम्ही सांगितलय इथ आवाज येतात म्हणून.. आता आम्ही जर बाहेर कुठे हे सांगितलं तर परत इथे कोणी राहायला येणार नाही.. आमच्यामुळे त्याच नुकसान तो करून घेणार नाही."

"आणि आपल्याला काय झालं तर.. आपलं नुकसान झालं तर चालेल.." रेश्मा एकदम मोठ्याने बोलू लागली.

"काय झालं तरर् ऽ.. तरची गोष्ट आहे ती.. अजून आपल्याला काही झालं नाही." मनिषाने तिला उत्तर दिलं.

"मग व्हायची वाट बघताय का..?" मधु मधेच म्हणाली.

"मधु नुसते आवाज ऐकू येतायत. दुसरं काहीच नाही. तुला काय वाटत इथं खरच भूत आहे. आणि असतं तर मग आम्ही अजून जिवंत कशा आहोत. पहिल्या दिवशीच मारायला हवं होतं ना. कशाला खेळत बसलय भूत आमच्यासोबत."

"मनिषा तुला भीती वाटत नसेल पण मला वाटते. आणि मला आता नाही राहायचं इथे. आपण बोलू प्रोफेसरांशी."

"राहायचं मला पण नाही. पण दुसरा पर्याय पण नाही. प्रोफेसरांशी बोलू, मी नाही म्हणत नाही. पण मला नाही वाटत ते आपली मदत करू शकतील."

"पुढच पुढे बघू. मला आता इथं राहायचं नाही. उगाच जीवाशी खेळत बसायचं नाही. रोज असं वाटत की आज मरते की उद्या मरते.." रेश्मा भितीत बोलत होती.

"रेश्मे, एवढ पण काही झालं नाही घाबरायला. नुसत्या आवाजाने घाबरतेस. उद्या खरंच भूत आल्यावर काय करशील..?" मनिषा तिला ओरडत बोलू लागली. रेश्मा शांत बसून होती. ती अजून घाबरलेलीच होती.

"भुत येईल का नाही माहीत नाही पण आता कॉलेजला आला नाहीत तर फोन मात्र नक्की येईल. चला, या लेक्चरला तर चला. नंतर मग वाटल्यास प्रोफेसर गाठ पडतात का बघू.."

"चालेल. रेश्मा पटकन उठत म्हणाली. गाठ पडतीलच. त्यांना सगळं सांगू. करतील ते मदत. मनाने चांगले आहेत ते."

"ए ऽ बाई लगेच गावभर करू नको. जे काही बोलायचं ते मी बोलेन. तुम्ही दोघी काही बोललात तर बघा मग." मनिषाने दोघींना दम दिला.

०० 

पुढच्या अर्धा एक तासात तिघी प्रोफेसरांची वाट बघत ग्रंथालयात बसल्या होत्या. प्रोफेसर मराठी विषय शिकवण्यात निपूण तर होतेच पण इंग्रजी विषयात देखील त्यांचा कोणी हात धरू शकत नव्हत. त्यामुळेच त्यांना प्रत्येकजण आदराने प्रोफेसर म्हणूनच ओळखत होता.

त्यांची भेट कॉलेजमध्ये दोनच ठिकाणी व्हायची, एक तर वर्गात शिकवताना किंवा ग्रंथालयात वाचन करताना.

ही वेळ प्रोफेसरांच्या ग्रंथालयात येण्याची होती. म्हणूनच तिघी ग्रंथालयात बसून त्यांची वाट बघत होत्या. रेश्मा अजूनही चिंतेत दिसत होती तर मधु टेबलावर ठेवलेली पुस्तक चाळत होती. मनिषा रहस्यकथेची पुस्तकं पाहण्यात गुंग होती.

तेवढ्यातच प्रोफेसर आले. त्यांच्या मागोमाग पोरींचा घोळकाही आला. प्रोफेसरांना आलेलं पाहून मनिषाने एक पुस्तक हातात घेऊन बाकीची पुस्तकं रकान्यात ठेवली.

"सांगा ना प्रोफेसर, आम्ही कोणाला सांगणार नाही तुमची लव्हस्टोरी." पोरींचा घोळका त्यांना विणवणी करत होता.

प्रोफेसर हसत हसत खुर्चीत येऊन बसले. त्यांनी बसल्या बसल्याच त्या तिघींवर नजर टाकली.

"आता माझी स्टोरी ऐकून काय करणार तुम्ही. उगाच आमच्या प्रोफेसर बाईंना कळेल आणि माझी पंचाईत करून ठेवाल." तसं म्हणत ते हसू लागले अन् त्यांची नजर मनिषावर गेली.

"सांगा ना सर आम्हाला ऐकायला मजा येईल. तुमच्या काळात प्रेम कसं होत होतं ते तरी कळू दे आताच्या पिढीला." मनिषाने हातातल पुस्तकं टेबलवर ठेवलं अन् त्यांच्या पुढेच बसली.

मधु, रेश्मा दोघीही त्या घोळक्यात येऊन उत्सुकतेने प्रोफेसरांना पाहू लागल्या. प्रोफेसरांनी गालावर हसू ठेवलं आणि बोलायला सुरुवात केली.

"बर.. सांगतो. पण हे तुमच्यातच ठेवायचं." त्यांनी आपली तर्जनी उठवत त्यांना प्रेमळ दम दिला.

"हो.." घोळक्याचा एकत्रच आवाज आला.

"बर, आता सांगायचं झालं तर होती एक मुलगी आमच्या आयुष्यात." मुलींचा घोळका हसऱ्या नजरेने उत्सुकतेने ऐकू लागला.

"मला सुद्धा आवडायची. प्रेम जडलं आमचं तिच्यावर. फार सुंदर होती, अगदी जास्वंदाच्या पांढऱ्या फुलासारखी गोरीपाण. तिच्या घाऱ्या डोळ्यांत स्वत:ला हरवत होतो मी. तिच्या उजव्या डोळयात एक बारीक तीळ होतं. तिच्या एकाच गालावर पडणारी खळी मला फार मोहित करायची."

"ह्म्म..ऽ" पोरींनी प्रोफेसरांची टर उडवली. तसे ते लाजू लागले.

"आमच्या वेळीना ऋषी कपूर नवीनच नट प्रसिद्ध झालेला. त्याचा सिनेमा लागला की आम्ही जायचो कोल्हापुरात. सिनेमा संपला की रंकाळ्यावर बसायचो बोलत. प्रेमाच्या गप्पा मारत. पुढच्या आयुष्याची स्वप्न रंगवत." तसे प्रोफेसर त्यांच्या भूतकाळात हरवून गेले.

"सर.." मधुने त्यांना आवाज देऊन वर्तमानात आणलं.

"पुढे, काय मग.. तुमचं आणि मॅडमच लग्न कसं जमलं..?"

तसे ते विषण्णपणे हसले.

"आपण कुठे चुकतो माहिती आहे तुम्हाला..?"

"नाही." सर्वांनी एकत्रित उत्तर दिलं.

"आपण ना उगाच स्वप्न रंगवत बसतो. भविष्याचा विचार करत बसतो. तिथेच चुकतं. आपल्या आयुष्यात पुढे काय होणार आहे याची आपल्याला

कल्पना नसते. आपण धावायचा प्रयत्न करतो अन् एका आडमोडी वळणावर पडतो."

"म्हणजे सर..?"

"असंच एक आडमोडी वळण आलं अन् आमच्या दोघांचा रस्ता वेगवेगळा झाला."

"कोणतं वळण सर..?"

"जातीचं.." प्रोफेसर गंभीर आवाजात म्हणाले.

मुलींचा घोळका शांत झाला.

"जातीचं एक वळण आलं अन् दोन तरुण प्रेमळ मनांना वेगवेगळ्या रस्त्याला जावं लागलं. समाजाने त्यांना वेगळं केलं."

"म्हणजे सर, मॅडम म्हणजे.." मनिषा हळू आवाजात म्हणाली.

"होय. मी प्रेम केलेली व्यक्ती मॅडम नाही. मॅडम सोबत तर माझं लग्न झालं आणि प्रेम कालांतराने." तसे ते हलकेसे गालात हसू लागले.

"मग सर त्या मुलीच काय झालं. तुम्ही का वेगळे झालात. तुम्ही तुमच्या घरच्यांना समजावलं का नाही..?" रेश्माने विचारलं.

"त्या वेळी लोकांची मानसिकता वेगळी होती. प्रेमाला महत्त्व नव्हतं. जातीला महत्त्व होतं."

"ती कोणत्या जातीची होती सर..?"

"ती होय." प्रोफेसर क्षणभर विचारात गेले अन् बोलू लागले.

"असं समजा, मी ज्या जातीत आहे त्यापेक्षा वरच्या जातीची ती होती. आता आमच्या दोघांची जात तेवढी विचारू नका." तसं म्हणत ते हसू लागले..

"पण सर.." मधु बोलू लागली.. "तुम्ही पळून.." तशी ती एकदम शांत झाली.

प्रोफेसर हसत हसत बोलू लागले, "हिंम्मत नव्हती तेव्हा. तिच्यातही आणि माझ्यातही.. दोघांनी घराला महत्त्व दिलं." तसे म्हणत ते शांत झाले.

मुलीसुद्धा त्यांना शांत चित्ताने पाहू लागल्या.

"पण काही हरकत नाही. एक गोष्ट लक्षात घ्या, आपल्या आयुष्यात जे काही होत ते चांगल्यासाठीच होत. कालांतराने माझं मॅडमसोबत लग्न झालं. तिचही लग्न झालं. ती तिच्या आयुष्यात सुखी झाली. मी माझ्या आयुष्यात सुखी झालो."

"ही गोष्ट तुम्ही सुद्धा लक्षात ठेवा." सर गालात हसत हसत बोलू लागले. "नाही तर मी त्याच्याशीच लग्न करणार.. नाही झाल तर जीव देणार असं बोलून आईबापाशी भांडू नका."

सगळ्या मुली एकत्रच जोरजोरात हसू लागल्या.

हसता हसता सर बोलू लागले, "बघा शेवटी आई-वडिल जे काही करतात ते चांगला विचार करूनच करतात. बाकी ज्याची त्याची मर्जी. आपण कोण..?"

"सर पुन्हा कधी भेट झालेली..?" मनिषाने विचारलं.

"नाही. तिचं लग्न झाल्यानंतर ती परत इथे आलीच नाही." त्यांनी शांतपणे उत्तर दिलं.

"तुम्हाला कधी आठवण आली नाही..?"

"कसंय मनिषा, एकदा संसारात रमलं की माणूस सगळं विसरून जातो."

मनिषा शांत चित्ताने त्यांना पाहत होती. सर गालात बारीक हसू ठेवून सर्वांना पाहत होते. त्यांनी हसत हसत विचारलं, "बोला आणखी माझी दर्दभरी दास्तान ऐकायची आहे की आजच्या पुरतं बास झालं."

तशा सर्व मुली हळुवार हसल्या.

"बर चला मला निघायचं आहे. काही असेल तर उद्या गप्पा मारू." त्यांनी तसं म्हणताच, मुलींचा घोळका हळूहळू मागे फिरला. रेश्मा, मनिषा अन् मधू तिथेच बसून राहिल्या.

"सर तुमच्याशी बोलायचं आहे." मनीषा गंभीर होत बोलू लागली.

"महत्वाचं आहे."

"हो म्हणजे."

"कशाबद्दल.?"

"म्हणजे सर.. वेगळा विषय आहे जरा. तुमची मदत हवी होती."

"बोला काय सेवा करू..?" सर हसत हसत विचारू लागले.

"ॲक्च्युली सर आम्ही नुकतीच आमची खोली बदलली."

"बर."

"पण प्रॉब्लेम असा आहे की, आम्हाला आता तिथ राहायचं नाही. आणि आम्ही सहा महिन्याच भाडं देऊन बसलोय. घरमालक काही ऐकत नाही. तुम्ही जरा लक्ष घातलंत तर मदत होईल आम्हांला."

"मनिषा यात मी कसं बोलणार..?"

"सर.." मधु मध्येच बोलू लागली. "गायकवाडांची खोली घेतली आहे यांनी भाड्याने. विलास गायकवाड नाहीत का ते."

प्रोफेसर काही क्षण चिंतेत गेले अन् बोलू लागले.

"मग अडचण काय आहे. चांगले आहेत ते. मित्र आहेत माझे."

"अडचण अशी नाही सर. पण आता आम्हाला खूप लांब वाटतय. कॉलेज ते रुम जरा जास्तच अंतर आहे."

तसे प्रोफेसर हसू लागले. "मग यात तुमची चुकी. तुम्ही आधी विचार करायला हवा होता."

"होय आमच्या लक्षात आलं सर. प्लीज तुम्ही काही तरी करा ना."

"बर मी बघतो बोलून. पण गॅरंटी देऊ शकत नाही. तसं पाहिलं तर यात थोडीफार तुमची सुद्धा चूक आहे."

तिघीही जरा नाराज दिसू लागल्या.

रेश्मा न राहवता बोलू लागली.

"खरं तर सर फक्त लांब आहे म्हणून आम्हाला रूम नकोय असं नाही आणखी एक कारण आहे."

मनीषा थोड्या रागातच रेश्माला पाहू लागली.

"काय कारण आहे..?"

"भीती वाटते सर तिथे. असं वाटतं काहीतरी आहे. कोणीतरी आहे. आणि आवाज.."

"आवाजामुळे भीती वाटते सर.." मनिषा रेश्माचं वाक्य अर्धवट तोडत बोलू लागली. "वाऱ्याचा आवाज.. दूरवर कुठे, कोणी किंचाळत आहे असा आवाज.."

प्रोफेसर जरा चिंतेतच गेले. त्यांना काय बोलाव ते सुचेना. रेश्मा अन् मनिषा दोघीही एकमेकींना रागाने पाहू लागल्या.

"खरं तर तिथं जास्त कोणी राहत नाही ना त्यामुळे जरा जास्तच भीती वाटते दोघींना." मधु बोलू लागली.

"बर. असं असेल तर बोलतो मी. पण पुन्हा एकदा सांगतो, मी गॅरंटी देऊ शकत नाही. हा त्यांच्यातला आणि तुमच्यातला व्यवहार आहे." त्यांनी तिघींवर एक नजर फिरवली.

"चालेल सर. तुमच्या बोलण्यामुळे काही मदत झाली तर झाली." तसं म्हणत तिघीही मागे फिरल्या.

मनिषा. प्रोफेसरांनी तिला आवाज दिला. "तुझं आरशातलं प्रेम इथंच राहिलं." त्यांनी टेबलावरचं पुस्तक तिच्या हातात दिलं.

"थँक्यू सर." तिघीही हसऱ्या चेहऱ्याने तिथून बाहेर पडल्या.

०० 

आज मधु सुद्धा दोघींच्या खोलीवर राहणार होती. नेमके कसले आवाज येतात हे तिला सुद्धा ऐकायचं होतं. संध्याकाळ होत होती तसं वातावरण बदलत होत. सूर्यास्तानंतरच जग जन्माला येत होत.

भयाण शांतता पसरली होती.. सोबतीला मंदपणे वाहणारा वारा अन् किर्र ऽ आवाज करणारा रातकिडा होता.

रेशमाचे हातपाय आतापासूनच थरथर कापू लागले होते. मनिषा म्हणावी तितकी घाबरली नव्हती. तिला हा जो काही प्रकार आहे तो भुताटकीचा वाटत नव्हता. पण रडणाऱ्या बाईचा ज्या प्रकारे आवाज येत होता तो मात्र धडकी भरवणारा होता. त्यात एक भीती होती. एक राग होता.

एक विनंती होती. एक करुणा होती. अन् ज्याअर्थी इतक्या सर्व भावना एका आवाजात येत होत्या त्या अर्थी ही कहाणी काही तरी वेगळीच होती. या कहाणीच रहस्य तिला जाणून घ्यायचं होत.

ही कहाणी, हे रहस्य तिला कोणी सांगू शकत नव्हतं. कोणाला ते माहित नव्हतं. हे रहस्य आज आपण जाणून घ्यायचंच हे मनिषाने ठरवलं होत. आज काहीही झालं तरी त्या आवाजाचा माग काढायचा अन् ती बाई नेमकी कोण आहे हे पहायचं हे तिने ठरवलं होत.

जेवण वगैरे उरकून तिघीही शांतपणे बोलत बसल्या. प्रोफेसरांची लव्हस्टोरी हाच त्यांच्या चर्चेचा विषय होता.

"तुला काय वाटत मनिषा प्रोफेसर खरं बोलत असतील. त्यांची लव्हस्टोरी खरी असेल..?"

"मधु, प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. आपण आज एक बाजू पाहिली. आता ती खरी होती का खोटी होती हे आपल्याला माहीत नाही. त्यांनी त्यांच्या बाजूने गोष्ट सांगितली. पण दुसरी बाजू कळल्याशिवाय आपण कोणाच खरं कोणाच खोटं हे ठरवू शकत नाही."

"म्हणजे त्यांचे आईवडील बरोबर होते असं म्हणायचं आहे का..?"

"तसं नाही. बघ त्यांच्या वेळी काय परिस्थिती होती हे बघायला आपण नव्हतो. त्यांनी असा निर्णय का घेतला हे समजण्यासाठी त्या वेळची परिस्थिती समजून घेणं आवश्यक आहे. आणि आता ते शक्य नाही."

"तू अशी अवघड वाक्यात का बोलतेस गं ऽ. जरा व्यवस्थित कळेल असं बोलत जा ना.."

"मधु, तुला नाही कळायचं तिचं काही." रेश्मा बोलू लागली. "तिला जेवलीस का विचारलं ना, तर ती जेवण कधीपण प्रेमाने वाढायच मग पोट भरत असं काही तरी बोलते. आता यात ती जेवली आहे की नाही हे आपण ओळखायचं." तसं म्हणत रेश्माने नाक मुरडलं.

मनिषा गालात हसू लागली. मधु ही हसू लागली. रेश्मा भीतीत होती पण गालावर हसू आलं होत.

तिघीही हळूहळू हसू लागल्या. दोनचा काटा पुढे सरकला अन् हळूहळू वातावरणात बदल जाणवू लागला.

थंडी हलकीशी वाढली. ती जाणवताच अंगावर शहारे येऊ लागले. नारळीच्या पानांचा सळसळ आवाज वाढू लागला.

रातकिड्यांचा आवाज वाढला. हळूहळू एक आवाज पुन्हा धडकी भरवू लागला.

तो हंबरडा ऐकू येताच तिघींच्या अंगावर काटा आला अन् रेश्माची किंचाळी बाहेर पडली.

"ए ऽ गप.." मनिषाने तिचं तोंड धरलं. मधु भितीने थरथरू लागली. तिने अंगावर चादर आणखी जोरात ओढून घेतली अन् रेश्माला मिठी मारली. दोघीही एकमेकींना मिठी मारून बसल्या. मनिषा खिडकीजवळ गेली अन् आवाजाचा मागोसा घेऊ लागली.

"नको मनिषा खिडकी उघडू नको." रेश्मा घाबरत घाबरत बोलू लागली.

मनिषाने तिचं ऐकलं नाही. तिने हळूच खिडकीच दार हलकंस उघडल अन् काही दिसतंय का ते पाहू लागली.

तिला आता आवाज स्पष्टपने ऐकू येत होता. तो आवाज येताच तिच्या अंगावर पुन्हा काटा आला. ती त्या आवाजाच्या दिशेने पाहू लागली. पण तिला काहीच दिसत नव्हतं. दूरवर तिला फक्त वाऱ्यामुळे हलणारं गवत अन् पडलेला वाडा एवढंच काय ते दिसत होतं.

मधु धाडस करून मनिषा जवळ आली. ती सुद्धा बाहेर काही दिसतंय का ते पाहण्याचा प्रयत्न करू लागली.

"मने कसला आवाज म्हणायचा ह्यो ऽ.. कसं राहताय तुम्ही इथ..?"

"आता कळालं तुला आम्ही रात्रभर का झोपत नाही ते. सकाळी लेक्चर का अटेंड करत नाही ते."

"का म्हणून तुम्ही इथं राहायला आला कुणास ठाऊक. काय पण करा खरं इथनं निघा. पैसे गेले तर जाऊ दे."

मनिषा फक्त ऐकून घेत होती. तिची नजर त्या पडक्या वाड्यावर खिळून होती कारण तिला काहीतरी हालचाल होताना दिसत होती.

"मधे तुला काय दिसतंय बघ जरा."

मधु तिचे डोळे मोठे करून पाहण्याचा प्रयत्न करू लागली. ती हळूहळू मागे सरली.

"कोण तर हाय. मने, रेश्मा कोण तर हाय तिकड."

"कोण आहे..?" रेश्मा भीतीने थरथरू लागली. ती सुद्धा त्यांच्याजवळ आली. "कोण आहे.. कुठ आहे..?"

"समोर. एकदम समोर बघ. पडका वाडा आहे. त्या खांबाला धरून कोण तर बसलय. तिच्या साडीची किनार हलतेय." मनिषा हळूहळू बोलत होती.

"होय दिसली." रेश्मा पटकन मागे सरली. तिने मधुला मिठी मारली.

मनिषा एकटक त्या आकृतीकडे बघत होती. हळूहळू आवाज वाढत होता. त्या बाईचे उच्चार स्पष्टपने आता ऐकू येत होते.

"माझं बाळ मला द्या.. माझं बाळ द्या."

तिचं बोलणं ऐकू येताच अंगावर काटा येत होता. प्रत्येक शब्दानंतर तिचा हुंदका मनात धडकी भरवत होता. रेश्मा अन् मनिषा खिडकीजवळ आल्या. दोघींचे हात थरथर कापत होते.

"खिडकी बंद करा. मला आता खूप भीती वाटतेय." रेश्मा घाबरत घाबरत बोलू लागली.

"जरा थांब. ती कोण आहे ते फक्त दिसू दे."

"कोण आहे म्हणजे. भूत आहे तिकडं. कळत नाही तुला."

"रेश्मा भूत रडत नसतं. रडवत असतं. कोण तर बाई आहे. नीट बघ."

"काय बाई आहे. दिवसाची कुठ असते मग. दिवसा काही होत नाही तिला. रात्रीची का रडते मग. आणि अशी का बडबडते. माझं बाळ द्या. माझं बाळ द्या.. दुसऱ्या कोणाला तिचा आवाज जात नाही. आपल्यालाच कसा येतो." रेश्मा तावातावाने बोलू लागली.

"रेश्मा शांत हो. मला पण हेच प्रश्न पडले आहेत."

"तू खिडकी बंद कर." मधुने खिडकी बंद केली अन् मनिषाचा हात धरून तिला बेडजवळ घेऊन बसली.

रेश्मा, मनिषा अन् मधू तिघीही एकत्र जवळ बसल्या.

"मनिषा", मधु बोलू लागली. "रेश्मा बरोबर बोलतेय. हा भुताटकीचा प्रकार आहे."

"काय भुताटकी मधु. भूतं दिसत नाहीत. आपल्याला ती बाई सरळ सरळ दिसत आहे. तिचा आवाज ऐकू येतोय. कोणी तरी वेडी झालेली बाई आहे ती."

"अशी कोणी बाई नाही या गावात."

"तुला माहित नसेल." मनिषा दोघींना बाजूला सारत खिडकीजवळ गेली. तिने खिडकी उघडली अन् पुन्हा बाहेर पाहू लागली. त्या दोघीही खिडकीजवळ गेल्या.

"कुठे दिसत नाहीये ती बाई आता. कुठे गायब झाली अचानक."

"भूत आहे ना.. भूतं अशीच गायब होतात." रेश्मा घाबरत घाबरत बोलू लागली.

मनिषा तिची नजर सर्वत्र फिरवत होती पण तिला ती बाई कुठेच दिसत नव्हती. तिचा रडण्याचा आवाज आता शांत झालां होता. तिचे बोल आता ऐकू येत नव्हते.

"तुमच्यामुळे झालं सगळं. जरावेळ शांत बसला असता तर कळालं असतं.." मनिषा रागारागात बोलू लागली अन् बेडवर जाऊन बसली.

"आम्हांला कळालंय हा भूताटकीचा प्रकार आहे. तुलाच ते कळत नाहीये." रेश्माने तिला उत्तर दिलं अन् तीसुद्धा तिच्या बाजूला बसली.

"जरा गप्प बसा. उगाच आपआपसांत भांडू नका." मधू त्यांची समजूत काढू लागली. तिने खिडकी बंद केली.

"बास झालं. मला आता राहवत नाही. मी जातेय त्या वाड्यात. मला बघायचंच आहे ती बाई कोण आहे ते." तसं म्हणत ती बाहेर पडलीही.

मधु अन् रेश्मा तिला बघतच राहिल्या.

"मनिषा अगं ऽ थांब. अशी जाऊ नकोस." दोघी तिच्या मागोमाग जाऊन तिला अडवू लागल्या.

"तुम्ही नका येऊ. माझं मी बघून येते." मनिषा तावातावत बोलू लागली.

"नको आम्ही पण येतो." रेश्मा घाबरत घाबरत का असेना पण बोलत होती. तिघिंनी एकमेकींचा हात धरला अन् वाड्याची दिशा धरली.

वाड्याचा आसपासचा परिसर एकदम भयावह होता. आजूबाजूला घनदाट झाडी होती. गवाताची पाती माणसाएवढी वाढलेली होती. झाडाच्या पानातून चंद्रकिरणं वाट शोधत जमिनीवर येत होतीत.

रातकिड्याचा आवाज तर होताच पण भयाण शांततेचा आवाज त्यापेक्षा जास्त भयावह वाटत होता.

वाडा पूर्ण पडलेला होता. अर्धवट पडक्या भिंती जळालेल्या अवस्थेत दिसत होत्या.

त्या तिघी एका खांबाजवळ उभ्या राहिल्या. ती बाई दिसते का ते पाहू लागल्या. पण त्यांना ती कुठेच दिसत नव्हती. हळूहळू चालत त्या दरवाज्याजवळ गेल्या. समोर बेछुट अंधार पसरलेला होता. असं वाटत होतं हा रस्ता इथं संपलाच आहे.

तिघी दरवाज्यासमोर उभ्या राहिल्या पण कोणाचाही आत जाण्यासाठी पाय सरकेना. शेवटी मनिषाने एक पाय पुढे टाकला.. तोच.

"माझं बाळ दे, माझं बाळ दे." असं किंचाळत एका सावलीने तिचा हात जोरात धरला.

तिघीही बेंबीच्या देठापासून किंचाळल्या. जागीच स्थिरावल्या. समोरचं ते भयावह रूप पाहून त्यांची दातखिळी बसली.

समोरच्या अंधारातल्या एका सावलीने मनिषाचा हात घट्ट धरला होता. ती सावली एक पाऊल पुढे येताच त्या तिघींची किंचाळी आसमंतात पसरली.

एक वृध्दबाई त्यांच्या समोर उभी होती. तिच्या चेहऱ्यावर सुरकुत्यांच जाळ पसरलं होतं. तिचे चिडलेले लालसर डोळे आग ओकत होते. तिच्या

पांढऱ्या केसांचा झुपका वाऱ्याने मागे गेला होता. तिचा किंचाळणारा कर्कश आवाज कानठळ्या बसवत होता.

मनिषाचा हात तिने जोरात धरला होता अन् फक्त इतकच म्हणत होती. "माझं बाळ मला दे. माझं बाळ मला दे."

त्या तिघी एकदम घाबरून गेल्या होत्या. रेश्मा फक्त किंचाळत होती. मधुला काय करावं ते कळत नव्हत. त्या बाईचा हात सोडवण्याचा ते प्रयत्न करत होते पण त्या तिघींनाही तो सुटत नव्हता.

मनिषा घाबरलेल्या अवस्थेतही त्या बाईचं निरिक्षण करत होती. तिच्या घाऱ्या डोळयांना पाहून न जाणो का पण ती बाई आज तिला ओळखीची वाटत होती.

मधुने शेजारी पडलेला एक लाकडी ओंडका घेतला अन् त्या बाईच्या हातावर मारला. फटका बसताच ती बाई किंचाळली अन् तिने मनिषाचा हात सोडला.

हात सुटताच त्या तिघी पळू लागल्या. ती बाई दरवाज्यामागे गेली. मनिषा थांबली. तिला आश्चर्य वाटू लागलं. तिला हे अपेक्षित नव्हतं. ती बाई यांचा पाठलाग करेल असं तिला वाटत होतं पण तसं झालं नव्हतं.

मधु अन् रेश्मा कधीच पळ काढत खोलीवर पोहोचल्या होत्या. त्या खिडकी उघडून मनिषाला पाहू लागल्या.. पण आता मनिषा त्यांना

दिसेनाशी झाली होती. त्या एकदम घाबरून गेल्या. अंगाचा थरकाप उडवा अशी घटना घडली होती. या परिस्थितीत काय करावं ते आता त्यांना कळत नव्हत.

त्यातच अंधाऱ्या रात्रीत हातात कंदिलदिवा घेऊन चालत येताना एक सावली दिसू लागली.

काळया बुरख्यातली ती व्यक्ती हातात दिवा घेऊन चालत जाताना, झाडात लपलेल्या मनीषाने पाहिलं.

ती व्यक्ती सरळ वाड्यात गेली. मनिषा डोळे मोठे करून आतल्या दृश्याचा अंदाज घेऊ लागली. पण तिला काही स्पष्ट दिसत नव्हतं. काही वेळाने ती व्यक्ती परत आली. मनिषाने स्वत:ला लपवून घेतलं.

तिला जवळून जाताना पाहून मनिषा अचंबित झाली. ती व्यक्ती कोण होती हे तिला कळालं होतं. ओोळखीच्या चेहऱ्याने अनोळखी चेहऱ्याची रहस्य उघडकिस आणली होती.

मनिषा रूमवर परत आली. ती येताच रेश्मा अन् मधू तिच्याजवळ आल्या.

"मनिषा तुला काही झालं तर नाही. तू बरी आहेस ना..?" दोघी मोठमोठा श्वास घेत तिची चौकशी करू लागल्या.

मनिषाने शांतपणे होकारार्थी मान डोलावली. ती विचारात हरवून गेली होती.

"किती भयंकर होती ती बाई. आता तरी पटलं ना.. ते भूतच आहे.." रेश्मा बोलू लागली.

"हो भूतच." मधूने तिला साथ दिली. "पण काळ्या बुरख्यात कोण आलं होतं..? ती बाई वाड्याच्या दिशेने का गेली..? पुढे रस्ता आहे का..? तू काय करत होतीस मनिषा..? तू का मागे थांबलीस..?"

मनिषा अजूनही विचारात होती. तिने जे पाहिलं यावर तिचा अजून विश्वास बसत नव्हता. दोघींनी तिच्या खांद्याला धरत तिला शुद्धीवर आणलं.

"मने, काय करत होतीस.. तू काही पाहिलस का..?"

"हो. मी पाहिलं. मी तिथेच लपून बसले होते. ती बुरख्यातली व्यक्ती सरळ वाड्यात गेली आणि काही वेळाने बाहेर आली. मी तिला पाहिलं. ती बाई नव्हती."

"मग. ते पण भूत होतं..?" रेश्माने डोळे मोठे करत विचारलं.

"नाही रेश्मा. ते भूत नव्हत. ती बाई नव्हती. ती आपल्या ओळखीची व्यक्ती होती."

"ओळखीची. कोण..?" दोघी प्रश्नार्थक नजरेने पाहू लागल्या.

मनिषाने दोघींच्या नजरेला नजर दिली अन् एक आवंढा गिळत उत्तर दिलं.

"प्रोफेसर."

दोघी आश्चर्याने एकमेकिंना पाहत होत्या. एकदमच त्या ठिकाणी भयाण शांतता पसरली. वारा मंदपणे वाहू लागला. रातकिडा किर्र ऽ आवाज करू लागला.

रात्र धिम्या गतीने सरू लागली. एका रात्रीत उगवलेली नवी रहस्य उद्याच्या सुर्याची वाट पाहू लागलीत.

०० 

नव्या किरणांसह सूर्य नवा दिवस घेऊन उगवला. नवा दिवस, नवे प्रश्न अन् नवी रहस्य.

रात्री मनिषा जे काही बोलली त्यावर कोण काही बोललच नाही. तिघीजनी विचारात हरवल्या अन् तशाच झोपी गेल्या. सकाळी त्यांना जाग येताच त्यांच्या मनातली पाखरं फडफडू लागलीत.

मनिषाच्या बोलण्यावर मधू अन् रेश्माचा अजून विश्वास बसत नव्हता. त्या दोघीही अचंबित झाल्या होत्या.

"मने, खरंच प्रोफेसरांना बघितलस. नीट आठव, अंधारात कुणाचा चेहरा व्यवस्थित दिसतोय..?" मधू मनिषाला पुन्हा पुन्हा तेच विचारत होती.

"मी जे बघितलं तेच सांगतेय. त्या काळ्या बुरख्यात स्वत: प्रोफेसर होते. अजूनही त्यांचा चेहरा मला स्पष्ट दिसतोय. मी का उगाच तुम्हांला खोटं सांगू."

"पण प्रोफेसर का आले असतील इतक्या रात्री..? आणि असा बुरखा घालून का आले ते..? त्यांना भिती कशी वाटली नाही..? ते वाड्यात कसे गेले..? त्या हडळीने त्यांना काही केलं तर नसेल ना..? प्रोफेसर तिच्या वशमध्ये तर नसतील ना..?" रेश्मा एकसारखी बडबडू लागली.

मनिषा त्रासिक चेहरा करून तिला पाहू लागली.

"रेश्मे किती भोळी आहेस गं ऽ तू.. कसं कळत नाही तुला..?"

"काय कळत नाही..?"

"अगं प्रोफेसर कोणाच्या वशमध्ये नाहीत. ती बाई म्हणजे कोणी हडळ किंवा भूत नाही. अगं ऽ जिवंत बाई होती ती."

"जिवंत बाई इतकी भयंकर दिसते..?" मधूने तिच्या मनातला प्रश्न विचारला.

"हो." मनिषाने पटकन उत्तर दिलं. "भयंकर दिसत असली तरी ती जिवंत बाई आहे. तिथे कोणी भूत नाही. प्रोफेसर कोणाच्या वशमध्ये नाहीत. ते शुद्धीत आले आणि शुद्धीत गेले."

"इतकं सगळं बघून पण कसं काय म्हणू शकतेस ते भूत नाही..?"

"कारण त्या बाईने मला धरलं होतं. मी तिला जवळून पाहिलं. तिचं निरिक्षण केलं. तुम्ही जे लाकूड मारलं तिच्या हातावर तेव्हा खरचटलेली जखम मी पाहिली आहे. रक्त पाहिलं आहे. कुठल्या भूताला रक्त येतं सांग बघू..?" मनिषा मधूला प्रतिप्रश्न करत बोलू लागली.

दोघीही शांत झाल्या.

"मला माहित आहे ती बाई कोण आहे ते." मनिषा असं म्हणताच दोघी डोळे मोठे करून विचारू लागल्या, "कोण..?"

"प्रोफेसरांची प्रेयसी आहे ती." मनिषा आत्मविश्वासाने म्हणाली.

"मने काय बोलतेस..?" मधूने विचारलं.

"होय. तिला बघताच मला प्रोफेसरांनी त्यांच्या प्रेयसीचं केलेलं वर्णन आठवू लागलं. जास्वंदाच्या पांढऱ्या फुलासारखी गोरीपाण. घारे डोळे. आणि सर्वांत महत्वाचं म्हणजे उजव्या डोळ्यात बारीक तीळ. मी पाहिलंय ते काल. मला तिला पाहताच शंका आली होती. आणि नंतर प्रोफेसरांना तिकडे पाहून तर आता खात्रीच पटली आहे."

"माझा तर विश्वासच बसेना. असं कसं होऊ शकतं. प्रोफेसरांनी मग आपल्याला त्यांची अशी खोटी स्टोरी का सांगितली असेल..? प्रोफेसर चांगले आहेत का वाईट..? प्रेयसी आपल्याजवळ राहावी म्हणून त्यांनी

तिच्या नवऱ्याला तर मारलं नसेल ना..? त्यामुळेच ती वेडी झाली नसेल ना..?" रेश्मा तिच्या मनातले एकएक प्रश्न त्यांच्यासमोर मांडू लागली.

"रेश्मा उगाच काहीही बोलू नकोस. आपल्याला अजून काहीच माहित नाही."

"प्रोफेसरांना जाऊन विचारायच का..?" रेश्माने भोळा चेहरा करत विचारलं.

मनिषा त्रासिक चेहरा करत बोलू लागली, "रेश्मे कधी तुझा बावळटपणा सोडणार गं ऽ तू..?"

"मी काय केलं..?"

मधु हसू लागली.

"नाय ग ऽ बाई तू काही केलं नाहीस." मधू तिच्या डोक्यावरून हात फिरवत बोलू लागली.

"प्रोफेसर माणूस कसा आहे हे आपल्याला माहित नाही. मी काल म्हणाले होते ना, नाण्याची एक बाजू आपल्याला माहित आहे. दुसरी बाजू नाही. प्रोफेसरांनी त्यांची बाजू आपल्याला सांगितली. आता नाण्याची दुसरी बाजू आपल्याला त्यांची प्रेयसी सांगेल."

"काय." रेश्मा पुन्हा दचकली.

"होय. आता तिच आपल्याला खरं काय ते सांगू शकेल. चला जाऊ या. त्या बाईलाच जाऊन विचारूया." मनिषा तसं म्हणताच त्या दोघी एकमेकींकडे आश्चर्याने पाहू लागल्या.

"मने, मी काय म्हणते.." मधू बोलू लागली. "काय गरज आहे आपल्याला. उगाच कशाला यात पडायचं. नको ती लडतड मागे लागायला."

मनिषा गालात हसत बोलू लागली, "न्यायासाठी.. न्याय मिळाला पाहिजे त्या बाईला. प्रोफेसर जर खरंच काही वाईट करत असतील तर ते थांबवलं पाहिजे. या वाड्याबद्दल ज्या काही खोट्या अफवा आहेत त्या लोकांना कळायला पाहिजेत. हे जे वाड्याचं रहस्य आहे ते बाहेर यायला पाहिजे. आणि मी ते आणणार."

"मने, मला तसं म्हणायचं नव्हतं. मला फक्त इतकंच म्हणायचं आहे की, आपण लहान आहोत उगाच काही जीवाचं बर-वाईट झालं तर कोण जबाबदार. आपल्या आई-बापानं कुणाकडं बघायचं..?"

मनिषा काही क्षण गंभीर झाली अन् बोलू लागली, "बरोबर आहे तुमचं.. तुम्ही यात पडू नका. पण मी शांत बसू शकणार नाही." तसं म्हणत मनिषा एकदम उठली अन् टेबलावरचा एक बारका टेडी घेऊन, बिस्किटपुडा घेऊन खोली बाहेर पडली.

मधु अन् रेश्मा एकमेकींना पाहू लागल्या. दुसऱ्याच क्षणाला त्या बाहेर पडल्या. पळत पळत जाऊन त्यांनी मनिषाचा हात धरला. मनिषाने गालात हसत मान डोलावली.

०० 

तिघींनी वाड्यात प्रवेश केला होता. प्रवेश करताच त्या तिघी एकमेकींना आश्चर्याने पाहत होत्या. वाडा आतून पूर्ण साफ होता. रोजच्या वापरातल्या वस्तू तिथे व्यवस्थित रचून ठेवल्या होत्या. वाडा बाहेरुन जळका अन् आतून साफ होता. हे त्यांना अनपेक्षित होतं.

वाड्याच्या एका कोपऱ्यात कालची वृद्धबाई बसली होती. या तिघींना आलेलं पाहून ती एकदम घाबरून गेली.

तिघीजणी तिच्याजवळ जाऊन बसल्या. तिची विचारपूस करू लागल्या. मनिषाने तिच्या हातातला टेडी त्या वृद्धबाई समोर ठेवला.

तो टेडी घेऊन ती रडू लागली. "माझं बाळ, माझं बाळ" म्हणत त्याला गोंजारू लागली.

मनिषाने तिला बिस्किटपुडा दिला. ती त्यातलं एकएक बिस्किट खाऊ लागली.

"तुझं नाव काय.." मनिषा तिला विचारू लागली. पण ती काहीच बोलत नव्हती.

"तुला इथे कोणी आणलं..? काय झालं तुझ्यासोबत..?" मनिषा तिला प्रश्न विचारत होती पण ती काहीच बोलत नव्हती.

"तोंडच उघडेना ही बाई. मने कसा मिळणार आपल्याला पुरावा..?"

मनिषा गंभीर नजरेने पाहत होती. त्या बाईला आता कसं बोलतं करायचं हेच कळत नव्हतं.

"मी देतो पुरावा." दरवाज्याच्या दिशेकडून एक भारदस्त आवाज आला.

त्या तिघींनी वाड्यात प्रवेश केलेल्या प्रोफेसरांकडे आश्चर्याने बघितलं अन् एकदमच दचकून एकमेकींना पाहू लागल्या.

प्रोफेसर येताच ती वृद्धबाई उठून त्यांच्या जवळ गेली. त्यांना मिठी मारत हातातला टेडी दाखवू लागली.

प्रोफेसर प्रेमाने तिची चौकशी करू लागले. रेश्मा, मनिषा, मधू आश्चर्याने ते दृश्य पाहू लागल्या.

प्रोफेसरांनी त्या वृद्ध बाईला एका बाजूला बसवलं अन् स्वत: त्या तिघींसमोर बसले.

"मी देतो पुरावा. बोला कोणता पुरावा हवाय तुम्हांला..?" प्रोफेसरांनी एकएक करून तिघींवर नजर फिरवली.

"सर हे सर्व काय आहे..?" मनिषा त्यांच्या नजरेला नजर देत बोलू लागली. "ही बाई कोण आहे..? हीची अशी अवस्था कोणी केली..? तुम्ही रात्री बुरखा घालून इथे का आला होतात..? हिच्या बाळासोबत काय झालं..? या वाड्याबद्दल चुकीच्या अफवा कोणी पसरवल्या..? आम्हांला सगळं खरं खरं सांगा." मनिषाने एक आवंढा गिळला.

"तुम्हांला पटेल माझं. मी जे सांगेन त्यावर विश्वास ठेवाल..?"

"हो सर.." रेश्मा पुन्हा भोळा चेहरा करून म्हणाली.

"ते पोलिस ठरवतील सर." मनिषा निर्भीडपने म्हणाली.

रेश्मा, मधूसकट प्रोफेसरसुद्धा डोळे मोठे करून मनिषाला पाहू लागले.

"बर." प्रोफेसर त्या वृद्धबाईकडे पाहत बोलू लागले.

"तुम्हांला मी माझी प्रेमकथा सांगितली. पण ती पूर्ण खरी नव्हती. ही माझी तीच प्रेयसी आहे."

मधु अन् रेश्मा मनिषाकडे पाहू लागल्या.

"हीच नाव मंदाकिनी. जवळच्याच गावात ही राहायची. आमच फार प्रेम होत एकमेकांवर. आणि अजूनही आहे."

"मग तुम्ही लग्न का केलं नाही..? हिची अवस्था अशी का झाली..?" मधुने विचारलं.

"जात आडवी आली. मी तुम्हांला काल आणखी एक गोष्ट सांगितली ती सुद्धा खोटी होती."

"कोणती.." मनीषाने डोळे बारीक करून विचारलं.

"मी खालच्या जातीचा, माझी प्रेयसी वरच्या जातीची. पण खरं तर मंदाकिनी खालच्या जातीची आहे. आणि हेच आमच्या वडिलांना आवडलं नव्हतं. त्यांनी आमच्या प्रेमाला नकार दिला. मंदिकिनीच्या परिस्थितीला नकार दिला."

"मग पुढे."

"पुढे मंदाकिनीच्या वडिलांनी तिचं लग्न लावून दिलं. ती खूप लांब गेली माझ्यापासून. कालांतराने माझं सुद्धा लग्न झालं."

"सर, हे सगळं तुम्ही काल सुद्धा सांगितलं होतं. आताही हेच सांगताय.. या बाईची अवस्था अशी का झाली त्याबद्दल सांगा..? याला तुम्ही तर जबाबदार नाही ना..?" मनिषा तावातावाने बोलू लागली..

मधु अन् रेश्माने तिला सावरलं.

"शांत हो मनिषा. प्रत्येक गोष्टीला माणूसच जबाबदार असतो असं नाही. काही गोष्टी असतात ज्या आपल्या हातात नसतात." प्रोफेसर शांत चित्ताने समजावू लागले.

"तुम्ही आजकालची मूलं सिनेमे पाहून सगळ्या गोष्टींचा तर्क त्यानुसार लावायला बघता. प्रत्येक परिस्थिती सिनेमाच्या दृष्टीकोनातून पाहता. पण कधी-कधी वास्तविकता वेगळी असते."

"तुम्हांला वाटत असेल मंदाकिनीच्या परिस्थितीला कदाचित मी जबाबदार आहे. पण तसं नाही."

"मनिषा तुला, ९३ चा किल्लारी भूकंप माहित असेल."

मनिषा बावरून त्यांना पाहू लागली.

"हो पण त्याचा इथे संबंध काय..?"

"मंदाकिनीने तिचं संपूर्ण कुटुंब त्या दुर्दैवी घटनेत गमावलं."

"त्या तिघींच्या अंगावर काटा आला होता." त्या एकमेकींना आश्चर्याने पाहत होत्या.

"मंदाकिनीला एक मुलगा अन् एक मुलगी होती. चांगला नवरा होता. चांगले सासू सासरे होते. ती तिच्या आयुष्यात सुखी होती. आनंदी होती."

"एक दिवस नवरा बायको कामासाठी म्हणून गावाबाहेर गेले अन् हे असं आक्रित घडलं."

"एका क्षणात होत्याच नव्हतं झालं. कित्येक परिवार उध्वस्त झाले. मंदाकिनीने तिच्या सासू सासऱ्यांना गमावलं. तिच्या लहान लहान लेकरांना गमावलं."

"हिच्या नवऱ्याला या घटनेचा धक्का इतका जोरात बसला की त्याला हृदयविकाराचा झटका आला."

प्रोफेसर एकदम शांत झाले. त्यांचे डोळे पाण्याने भरले.

"मनिषा, माणूस आयुष्यात प्रत्येक घाव झेलू शकतो. कुटुंबासाठी वाट्टेल ते करू शकतो. पण कुटुंब गमावण्याचं दुःख नाही झेलू शकत."

"आपण जगतोच आपल्या कुटुंबासाठी अन् जर का तेच राहील नाही तर.." बोलता बोलताच प्रोफेसर शांत झाले. त्यांच मन भरून आलं. डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या.

त्या तिघींची नजर मंदाकिनीकडे गेली. हातातला टेडी कुरवाळत, त्याला गोंजारताना एक दुर्दैवी आई त्यांच्या नजरेस पडली.

प्रोफेसर डोळे पुसत बोलू लागले.

"आमच्या शिक्षकांचा एक गट पाहणी करायला गेला होता. मी सुद्धा होतो. तिथंच मला मंदाकिनी नजरेस पडली."

"मातीच्या ढिगाऱ्याजवळ एकच वाक्य बडबडत बसली होती. "माझं बाळ मला द्या. माझं बाळ मला द्या."

"माझ्या पायाखालची जमीन सरकली. अशा अवस्थेत तिला पाहू शकत नव्हतो मी. तिचं कोणीच नव्हतं आता या जगात. कुटुंब गमावण्याचं दुःख झेलू शकली नाही ती. मला पाहिलं अन् तिच्या मधल्या प्रेयसीने हंबरडा फोडला." तसं म्हणत त्यांचे डोळे पुन्हा भरून आले.

"मंदाकिनीची मानसिक परिस्थिती बिघडली होती. तिच्यावर उपचार सुरू होते. पण कोणत्याच उपचाराला तिचा प्रतिसाद मिळाला नाही. या

जगात ती फक्त मला ओळखत होती. पुढे मागे तिचं कोणीच अस्तित्वात राहिलं नव्हतं. मी तिला आता एकटं ठेवू शकणार नव्हतो. मी तिला इथे घेऊन आलो."

प्रोफेसर एकदम शांत झाले.

मनिषा हिंमत करून बोलू लागली.

"सर, मग तुम्ही इतर दवाखान्यात किंवा घरी का नेल नाहीत..?"

"मंदाकिनीची मानसिक परिस्थिती खूपच वाईट होती. ती माझ्या पासून दूर गेली की कोणालाच ऐकत नव्हती. तिला वाटायचं समोर जी व्यक्ती आहे तिनेच तिच्या बाळाला नेलं आहे. त्यामुळे इतर दवाखान्यात ठेवणं अशक्य होतं. आणि राहिला प्रश्न माझ्या घरी नेण्याचा तर.."

तसे ते शांत झाले. त्यांना काय बोलाव ते कळेना. एक आवंढा गिळून ते बोलू लागले.

"माझा परिवार अशा बाईला स्वीकारेल की नाही हे मी सांगू शकत नव्हतो."

"मग तुम्ही इथे आणलं." रेश्माने विचारलं.

"हो. ही जागा बऱ्याच वर्षांपासून आग लागल्यामुळे पडकी होती. इथे लोकांचा वावर कमी होता. मी इथे जरा साफ सफाई केली आणि मंदाकिनीची सोय इथेच केली."

"मग सर या वाड्याबद्दलच्या अफवा खोट्या आहेत ना..?"

"नाही."

"म्हणजे..?" तिघी एकदम दचकल्या.

"हो म्हणजे थोड्या खऱ्या आहेत थोड्या खोट्या आहेत. मंदाकिनीला आजही झटके येतात. कधी कधी ती कोणालाच आवरत नाही. काही लोकांनी अशा स्थितीत तिला पाहिलं अन् भूत समजू लागले. मला सर्व माहीत होत पण एका दृष्टीने ते बरंच होतं."

"तसही इथे लोकांचा वावर कमी होता त्यात भुताच्या भीतीने आणखी कमी झाला. पण दाद दिली पाहिजे ती तुमच्या धाडसाला. तुम्ही बऱ्या इथे राहिलात."

रेश्मा बावरून त्या दोघींकडे पाहू लागली.

"तुम्ही काल धाडस दाखवलंत. मला ते आवडलं. मी कालच तुम्हांला भेटू शकलो असतो. पण मलाही पहायचं होत तुम्ही पुढच पाऊल काय उचलता ते." प्रोफेसर तिघांवर नजर रोखून म्हणाले.

मनिषा अजूनही विचारात होती.

"आता मला सांगा मी जे सांगितलंय ते तुम्हांला पटलंय की अजूनही पोलिस ठरवणार आहेत, माझी कथा खरी की खोटी ते." प्रोफेसरांनी शांत नजरेने विचारल.

मनिषा त्या दुर्दैवी आईकडे व्याकुळतेने पाहत होती. तिचे डोळे भरून आले होते. त्याच भरलेल्या डोळ्यांनी तिने नकारार्थी मान डोलावली.

"आमचं चुकलं सर. आम्ही तुमच्यावर उगाच शंका घेतली." मधु अन् रेश्मा एकत्रच म्हणाल्या.

"असं नका बोलू. मला तुमच्या धाडसाचं कौतुक आहे. पण एक विनंती सुद्धा आहे, ही गोष्ट आपल्या पुरतीच राहू दे. कसं आहे, काही रहस्य ही रहस्यच ठेवायची असतात."

"हो सर. आम्ही याबद्दल कोणाला सांगणार नाही." मनिषा डोळे पुसत म्हणाली अन् ती मंदाकिनी जवळ गेली. तिच्याजवळ जाऊन तिने हात पुढे केला.

मंदाकिनी बावरून प्रोफेसरांना पाहू लागली. त्यांनी हसून होकारार्थी मान डोलावली तसं तिने तिचा हात पुढे केला. प्रोफेसरांनी त्या तिघींची ओळख करून दिली.

"ही ओळख मंदाकिनीच्या कितपत लक्षात राहील माहित नाही त्यामुळे वाईट वाटून घेऊ नका." प्रोफेसर ओलसर डोळे पुसत म्हणाले.

"काही हरकत नाही सर. ही ओळख आम्ही विसरणार नाही हे मात्र खरं आहे." मनिषा गालावर बारीक हसू ठेवत म्हणाली.

"आणखी कोणत्या गोष्टीचा खुलासा बाकी आहे. की इतके पुरावे बास झाले.." प्रोफेसर हसत हसत विचारू लागले. तशा त्या तिघीजनी हसू लागल्या.

"एका गोष्टीचा खुलासा बाकी आहे सर." मनिषा थोडी गंभीर होत बोलू लागली. प्रोफेसर प्रश्नार्थक नजरेने पाहू लागले. रेश्मा, मनिषा ही पाहू लागल्या.

"कोणत्या..?"

"हे एवढ प्रेम कुठून आलं सर.. आजच्या जगात असं कोण प्रेम करतं..?"

तसे प्रोफेसर गालात हसले, अन् मनिषाच्या नजरेला नजर देत बोलू लागले.

"काल मला विचारत होतीस ना, आमच्या काळातलं प्रेम कसं असतं ते.. हे असं असतं प्रेम.. आमच्या काळातलं खरं प्रेम.."

प्रोफेसर बोलत बोलत मंदाकिनीजवळ जाऊन बसले. अन् तिच्याशी गप्पा मारू लागले. मंदाकिनी मोडक्या तोडक्या भाषेत त्यांच्याशी बोलू लागली.

मधु, रेश्मा, मनिषा अभिमानाने त्यांच्या प्रोफेसरांना पाहत होत्या.

०००० 

# अखेरचा निरोप

दिवसभर आपल्यासोबत ज्या गोष्टी घडतात, आपण जे पाहतो, जे वाचतो त्याचा परिणाम रात्री झोपताना आपल्या मेंदूवर काही अंशी होत असतो असं शास्त्रज्ञ म्हणतात. किमान एखाद्या घटनेचा विचार तरी नकळत आपला मेंदू करत असतो.

अशा एखाद्या घडलेल्या घटनेला, पाहिलेल्या किंवा वाचलेल्या गोष्टीला आपण किती महत्व देतो यावरून आपल्याला स्वप्न पडत असावीत असं संशोधकांच मत आहे.

सांगायचा हेतू इतकाच की, आपल्याला जी स्वप्न पडतात ती कोणत्या प्रकारची पडतील हे आपल्या हातात नाही.

एखाद्या पडून गेलेल्या स्वप्नामागचा अंदाज आपण दिवसभरात घडून गेलेल्या घडामोडींवर लावू शकतो इतकचं त्यामागचं शास्त्रीय कारण होय.

पण मेघाला पडणारी स्वप्नं ही नेमकी का पडत होतीत याचं कारण तिला अजूनही सापडत नव्हतं. अशी कोणतीच घटना तिने पाहिली नव्हती. असा एखादा चित्रपटही तिने पाहिला नव्हता अन् एखादा लेखही वाचला नव्हता.

मग झाडाला लटकेलं प्रेत सतत स्वप्नात का यावं ? एकदा, दोनदा नाही तर दररोज हेच स्वप्न का पडावं ? याचं उत्तर मेघाला काही केल्या मिळत नव्हतं.

स्वप्न आपल्याला बऱ्याच प्रकारची पडत असतात. त्याला काही मर्यादा नाहीत. आपण प्रेमात जरी नसलो तरी प्रेमाची स्वप्न आपल्याला पडत असतात. पण मेघाच्या बाबतीत असं का व्हावं, ते काही कळत नव्हतं.

हे असं रहस्यमयरित्या एखाद्या झाडाला लटकलेलं प्रेत दिसणं याला काहीच तर्क नव्हता.

गेले आठ दिवस मेघा हेच स्वप्न पाहत होती अन् घाबरून उठत होती. झोपेत दिलेल्या किंकाळीने तिच्या सोबतची मैत्रीण वर्षासुद्धा घाबरून ऊठत होती.

आजचा नववा दिवस होता. अन् पुन्हा मेघाच्या किंकाळीने वर्षा उठून बसली होती.

मेघा नेहमीप्रमाणे घाबरून उठली. वर्षा तिच्या सोबतच बसली होती. तिने तिच्या पाठीवरून हात फिरवत तिला पाणी प्यायला दिलं.

"मेघा आता पुरे झालं. तू आता घरी जा.. तुला खरंच वातावरण बदलाची गरज आहे."

"वातावरण बदलून काय होणार वर्षा, ही अशी स्वप्न पडायची बंद होतील का..?" मेघा पाण्याचा पेला खाली ठेवत म्हणाली.

"तुझ्या शरीराला, मेंदूला आराम हवाय मेघा. थोडे दिवस गावी जा. गावच्या वातावरणात रहा. इथ शहरात राहून काही होणार नाही. कुणास ठाऊक तुझ्या ह्या स्वप्नांची उत्तर तुला निसर्गात मिळतील." वर्षा तिच्या पाठीवर हात ठेवत म्हणाली.

मेघा विचारात हरवून गेली अन् तशीच पडून राहिली. रविवारची सकाळ सुद्धा तिच्यासाठी तणावाचीच ठरली.

००

सूर्याची तापलेली किरणं जेव्हा तिच्या डोळ्यावर येऊन थांबलीत तेव्हा कुठे मेघाला जाग आली.

तिने आवरून घेतलं. वर्षा हॉल मधेच  कोई मिल गया सिनेमा बघत बसली होती. हैला हैला गाण्यावर ती बसल्या बसल्याच ठुमकत होती.

मेघा आली तेव्हा तिने गाण्याचा आवाज वाढवला अन् तिला घेऊन नाचू लागली.

मेघा उदास चेहऱ्याने जबरदस्तीच हसू आणत तिला थांबवू लागली अन् तशीच सोफ्यावर बसली.

"मेघा अगं ऽ जरा दुसऱ्या गोष्टींत लक्ष घाल म्हणजे टेंशन कमी होईल. सतत त्याच स्वप्नाचा विचार करत बसतेस म्हणून ते स्वप्न पडत राहतं." वर्षा तिच्या बाजूला बसत तिची समजूत घालू लागली.

"वर्षा ते दृश्य जातच नाहीये डोळ्यासमोरून. ती व्यक्ती, ते झाड नजरेसमोरून हटतच नाही."

"अगं ऽ तू त्यांचा विचार सोडशील तर हटतील ना नजरेसमोरून. बघावं तेव्हा सतत विचारात बसलेली असतेस. आधी विचार करणं सोडून दे. बघ किती चांगला सिनेमा लागलाय. किती चांगलं गाणं आहे. किती चांगला हिरो आहे." तशी ती तिचं लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करू लागली.

"तुझ्या आयुष्यात पण येईलच ना असा एखादा हिरो कि आधीच आहे." तशी ती तिला गुदगुल्या करू लागली.

मेघा गालातल्या गालात हसू लागली.

"बघ लाजलीस म्हणजे आहे कोणी तरी हृतिक रोशन तुझ्या आयुष्यात. माझ्यापासून लपवून ठेवलस ना." तशी ती तिला आणखीनच गुदगुल्या करू लागली.

मेघा तिचा हात झटकत लहान मुलीसारखी हसू लागली. वर्षा तिला अजूनच हसवू लागली. काही क्षणातच वर्षाने मेघाच्या चेहऱ्यावरील तणाव दूर केला.

"वर्षा बास.. खरंच बास.. पोटात दुखतंय आता.." तसं म्हणत तिने वर्षाचा हात धरून ठेवला.

"सांग मग कोण आहे तो.. माझ्यापासून का लपवलंस ?"

"कोणी नाही गं ऽ बाई.. कोणी हृतिक रोशन नाही माझ्या आयुष्यात.."

"आता नसेल. पण आधी तरी होता ना. सांग की, मला लाजतेस का ?" तशी ती पुन्हा तिच्या पोटाला डिवचू लागली.

"नाही गं ऽ खरंच कोणी नाही. तुझ्यापासून का लपवू.. त्यात काय लपवण्यासारखं."

"हम्म ऽ.. सांगायचं नाही वाटतं तुला. असू दे. मला वाटलं, तू तरी मला मैत्रीण समजत असशील. पण जाऊ दे." तशी ती लटक्या रागात बोलू लागली.

"वर्षा अगं ऽ.." मेघा तिच्या हाताला धरत बोलू लागली तोच वर्षाने आपला हात मागे घेतला अन् नाक फुगवून बसली.

"बर सांगते बाई, अशी ऐकणार नाहीस.." तशी वर्षा हसून तिला पाहू लागली.

"आता कशी आलीस लाईनीवर." तसं म्हणत वर्षा मांडी घालून सोफ्यावर बसली अन् तिच्याकडे तोंड करून ऐकू लागली.

मेघा टिव्हीकडे बघत बोलू लागली, "हृतिक रोशन नाही पण या रोहित सारखा एक मुलगा होता जो वेड्यासारखं प्रेम करत होता."

"रोहित नाव होतं त्याचं ?"

"नाही. त्याचं नाव सुरज होतं. या सिनेमामधल्या रोहितसारखा होता तो."

"म्हणजे..?"

"यात हृतिक कसा थोडासा मतिमंद दाखवला आहे तसा होता."

"काय ऽ.. खरंच..?" वर्षा आवाक होऊन पाहू लागली.

"हो.."

"काय सांगतेस.. इंटरेस्टिंग आहे मग तुझी स्टोरी." तशी ती आणखी पुढे सरकत बसली.

"सेम असाच होता सुरज. सेम या हृतिकसारखा. तो असा अडखळत अडखळत बोलू लागला की बाकीची मुलं त्याची मस्करी करायचे."

"तुमच्या वर्गात होता ?"

"वर्गात नाही एकाच शाळेत. पण तो राहायला आमच्या घरामागच्या वस्तीत होता. लहानपणी खेळायलातेन म्हणून मुलं त्याला सोबत घ्यायचीत पण खेळण राहिलं बाजूला, पोरं त्याची मजा घेत बसायचीत. मला फार वाईट वाटायचं."

"मग ?"

"मी तरी काय करणार इतक्या साऱ्या मुलांत. मला तर फार भीती वाटायची. मला वाटायचं मी मध्ये पडले की मग मला पण बाकीची मुलं त्रास देतील. मस्करी करतील. माझी थट्टा करतील."

वर्षा तिच्या मांडीवर थाप मारत बोलू लागली, "हुशार होतीस. मग फक्त बघत बसायचीस त्याची मजा ?"

"नाही." मेघा तिच्या नजरेला नजर देत बोलू लागली, "मी गपचुप त्याच्या आईला जाऊन सांगायची अन् हळूच येऊन बसायची. त्याची आई मग हातात धोपाटण घेऊनच यायची अन् एकेकाची शाळा घ्यायची. मग मी आणि सुरज एकत्र हसत हसत त्या सर्व मुलांची मजा घ्यायचो." मेघाने तिच्या बालपणीतलं हसू चेहऱ्यावर आणलं.

"नशीब काही ॲक्शन तरी घेतलीस. तशी हुशार आहेस तू." वर्षा तिचा हात थोपटत म्हणाली, "मग पुढे..?"

"पुढे काय होणार.. लहानाचे मोठे कधी झालो कळालंच नाही.. बारावीपर्यंत सुरजची अन् माझी मैत्री चांगली टिकून राहिली. पण नंतर.." तशी ती शांत झाली.

"नंतर..?" वर्षाने प्रश्नार्थक नजरेने विचारलं.

जमिनीच्या दिशेने पाहत मेघा बोलू लागली, "एकदा सुरज माझ्याजवळ आला अन् त्याने माझा हात धरला."

"काय."

"ह्म्म ऽ. मी पण एकदम शॉक झाले. मला काहीच कळेना. मला म्हणाला, मला तू खूप आवडतेस. माझं तुझ्यावर प्रेम आहे. आपण लग्न करू. एकत्रच राहू." बोलता बोलता मेघा शांत झाली.

"मग ?"

"मग काय." मेघा शांत स्वरात बोलू लागली, "तो स्वप्न रंगवत होता वर्षा. पण ते शक्य नव्हतं. तो माझा मित्र होता. आणि दुसरं म्हणजे.."

"तो मतिमंद होता.." वर्षाने तिचं वाक्य पूर्ण केलं. मेघा अपराधीपणाच्या भावनेने खाली मान घालून बसून राहिली.

"समजू शकते मी." वर्षा तिचा हात थोपटवत बोलू लागली, "पुढे काय झालं मग ?"

"मला तर तेव्हा काहीच कळत नव्हत. मला त्याचा राग आला नव्हता. त्याची परिस्थिती मी समजू शकत होते. पण त्याची समजूत कशी घालायची हेच मला कळत नव्हतं."

"मी त्याचं ऐकून घेतलं, त्याला शांत होऊ दिलं अन् मग त्याची समजूत घालू लागले. त्याला मी सांगितल, सुरज आपण मित्र म्हणून चांगले आहोत

पण प्रॅक्टिकली आपलं लग्न होऊ शकत नाही. आपण एकत्र राहू शकत नाही."

"मग. ऐकलं तुझं त्याने ?"

"कुठल्या प्रियकराने ऐकलं असतं. सुरजची गोष्ट तरी वेगळी होती. पण त्याच्या जागी दुसरा कोणी नॉर्मल मुलगा असता त्याने तरी ऐकलं असतं का. आपल्याला आवडणारी मुलगी नकार देतेय आणि नुसता नकार नाही तर न पटणारं तत्वज्ञान पण सांगतेय. कोण त्या अल्लड वयात ऐकून घेतं."

"त्याने हात वगैरे उचलला मग तुझ्यावर ?"

"वर्षा सुरज मतिमंद असला तरी त्याला समज होती." मेघा तिच्या डोळ्यात डोळे घालून म्हणाली.

"त्याची समजूत घालायला मला खूप वेळ लागला पण माझं ऐकलं त्याने."

"नाराज झाला असेल ना खूप ?"

"ह्म्म..ऽ" मेघाने नुसताच हुंकार दिला.

"आता काय करतो सुरज ? त्यानंतर पण तुमची मैत्री टिकून राहिली ना ?"

मेघा एकटक जमिनीच्या दिशेने पाहत होती.

"मेघा.. काय विचारतेय मी ?" वर्षा तिच्या खांद्याला स्पर्श करत विचारत होती. पण मेघा शून्यात हरवली होती. बघता बघता तिने डोळे भरले अन् तिच्या डोळयातून अश्रू वाहू लागले. वर्षा एकदम बावरून गेली. मेघाला अचानक रडताना पाहून तिला काहीच कळेनासं झालं.

"मेघा अगं ऽ काय झालं अचानक ?" वर्षा तिच्याजवळ जात चौकशी करू लागली.

"वर्षा अगं ऽ आत्महत्या केली त्याने." तसं म्हणत तिचा हुंदका दाटून आला. ती रडू लागली. वर्षा आश्चर्याने तिला पाहू लागली.

काही क्षण गेले. मेघाने आपले डोळे पुसले. पाणी पिऊन ती पुढे बोलू लागली.

"ग्रॅज्युएशन नंतर मी इथे पुण्यात आले. आणि तो सुद्धा त्यांच्या वाडीतल्या घरात राहायला गेला. आमचं बोलणं, भेटण व्हायचंच नाही. आता वर्षभरापूर्वीच त्याने.. " तशी मेघा शांत झाली..

"कधी कधी असं वाटतं की माझ्यामुळेच त्याने हे असं केलं. मी स्वत:ला दोषी मानतेय." तसं म्हणत ती शून्यात हरवली. वर्षा तिला पाहू लागली. तिने अपराधीपणाचा केलेला चेहरा पाहून तिला वाईट वाटू लागलं.

"त्याने तसं काही लिहिलं होतं का कि कोणाला काही बोलला होता ?" वर्षा बारीक आवाजात विचारु लागली.

"नाही. तसं काही लिहिलं असतं तर मी वाचले असते का ?" मेघा दिर्घ श्वास घेत म्हणाली.

"मेघा मग तुला यात स्वत:ला दोष द्यायची अजिबात गरज नाही. कदाचित त्याने स्वत:च्या परिस्थितीला कंटाळून केलं असेल असंही असू शकतं."

"काय माहित पण गावातली लोकं तेच बोलतात म्हणूनच अजून त्याचा आत्मा त्याच घरात आहे अशी बडबड करतात."

"काय ऽ ?" वर्षा आवाक होऊन पाहू लागली. "काय बोलतेस ?"

"हो. लोकं म्हणतात तो अजून तिथेच आहे. त्याची आई वेडी नाही. ती एकटीच बडबड करत नाही."

"म्हणजे.. मला काही समजलं नाही. त्याची आईपण वेडी आहे ?"

"नाही. ती चांगली आहे. जेव्हापासून सुरजने आत्महत्या केलीय तेव्हापासून त्यांच्या घरावर एकामागून एक संकट येतच गेली. अपघातात त्याचे बाबा पण गेले, त्याची आई पूर्ण एकटी पडली. दिवसभर ती एकटीच बडबडत बसते."

"काय बडबडते ?"

"हेच, तिच्या परिस्थितीला दोष देत काहीतरी बडबडत असते. माझा मुलगा चांगला असता तर त्याने असं केलं नसतं. देव कसली परिक्षा घेतोय. असंच काय काय."

"गावातली लोकं काय म्हणतात ?"

"काहीही बडबडतात. म्हणे, तिच्या घरात सुरजच भूत आहे. कित्येकांना म्हणे त्याचा आत्मा तिथे दिसला होता. भास झाला होता. सुरजची आई त्याच्या मुलाशीच गप्पा मारत असते. काहीही वाट्टेल ते लोक बोलत असतात."

"काय सांगतेस ?" वर्षा जवळजवळ ओरडलीच.

"तुला काय झालं एवढं ओरडायला ?" मेघा आश्चर्याने पाहू लागली.

"तुला स्ट्रेंज वाटत नाही हे मेघा ?"

"यात काय स्ट्रेंज ?

"सुरजचा मृत्यू, त्यानंतर त्याच्या बाबांचा अपघाती मृत्यू, आईचं हे असं वागणं, भूत, आत्मा. तुला यात काही दिसत नाही ?"

"काय दिसायचंय. वर्षा, तू सुद्धा या भूतप्रेत गोष्टींवर विश्वास ठेवतेस का ?" मेघा तिला हातवारे करत विचारू लागली. "माझा नाही अशा गोष्टींवर विश्वास."

"तसं नाही वर्षा बघ ना, मला तर यात एक गोष्ट दिसतेय."

"कोणती गोष्ट ?"

"सांगते. मला फक्त एक सांग, सुरजच्या घरच्यांवर कुठल्या गोष्टीचा दबाव होता का ? कसलाही दबाव ? म्हणजे गावी अशा गोष्टी होतात नाही का, जमीनीसाठी, पैश्यासाठी."

"दबाव असा नाही. म्हणजे कधी त्यांच्या घरात भांडण झाल्याचं मला आठवत नाही." मेघा नकारार्थी मान हलवत बोलू लागली.

"सुरजने कधी काही सांगितलं होत ?"

"नाही. तसं काहीच नाही.. उगाच काही तरी तर्क काढू नकोस. तू समजतेस तसं काही भूत वगैरे नाहीये त्यांच्या जागेवर."

"जागेवर म्हणजे घरातच ना ?"

"हो म्हणजे तेच घरातपण आणि त्यांची कोणती जमीन आहे तिथेपण."

वर्षा एकदम चमकली अन् बोलू लागली, "कोणती जमीन मेघा..?"

"त्यांची एक जमीन वनक्षेत्राला लागून आहे. तिथं त्यांच छोटं आणखी एक घर आहे. मी इथे आल्यानंतर तो पण तिथे वाडीतल्या घरात राहायला गेला अन् तिथंच आत्महत्या केली त्याने."

वर्षा डोळे मोठे करून पाहत होती. "मेघा, आलंय माझ्या लक्षात. सर्व काही लक्षात आलय माझ्या."

"काय लक्षात आलंय ?"

"सुरजने आत्महत्या केली नाही मेघा." वर्षा तिचा हात धरत म्हणाली.

"काय बोलतेस. शुद्धीत आहेस का.?"

"हो. तुला आता मी गोष्ट सांगते. तु बोलता बोलता दिलेल्या माहितीवरून माझी एक थेरी तयार झाली आहे."

"कसली थेरी ?"

"सुरजच्या खुणाची." वर्षाने तसं म्हणताच मेघा डोळे मोठे करून पाहू लागली.

"सुरजच्या बाबांची वनक्षेत्राला लागून जमीन आहे. कोणीतरी त्यांची जमीन बळकाऊ पाहत होतं. त्यांनीच सुरजच्या बाबांना मारलं आहे आणि सुरजला पण."

"कशावरून अंदाज लावतेस हा ?"

"कशावरून ?" वर्षा डोळे मोठे करत बोलू लागली, "जमीनीचा वाद नवी गोष्ट नाही महाराष्ट्रासाठी. जमिनीमुळ पार महाभारत घडून गेलंय. आणि सुरजची जमीन वनक्षेत्र भागात होती म्हणजे नक्कीच काहीतरी असणार त्या ठिकाणी. हे मोठमोठे व्यावसायिक, आपले नेतेमंडळी अशा जमिनी उगाच हस्तगत करायला बघत नाही."

"मेघा लोक म्हणतात ते एक वेळ चुकीचं असू शकेल पण सुरजची आई खोट बोलत नसणार. कसाही असला तरी तो मुलगा होता तिचा. त्याने

खरंच आत्महत्या केली असती तर त्याचा आत्मा का दिसला असता कोणाला ? पण त्याला मारलंय, म्हणूनच त्याचा आत्मा अजून त्या जागेत आहे."

मेघा शांत होती. वर्षाच बोलणं तिला कितपत पटलं होतं हे तिलाही कळत नव्हतं.

"आणखी एक गोष्ट सांगू मेघा." वर्षा तिच्या नजरेला नजर देत म्हणाली. मेघा तिच्याकडे पाहू लागली.

"ही तुला जी स्वप्न पडतायत ना, ती उगीच पडत नाहीयेत. त्यामागे नक्कीच काहीतरी हेतू आहे."

"म्हणजे, नेमकं काय बोलायचं आहे तुला ?"

वर्षा तिच्या डोळ्यात पाहून बोलू लागली, "तुझ्या स्वप्नात दिसणारी व्यक्ती दुसरी तिसरी कोणी नसून सुरजच आहे."

मेघाच्या अंगावर शहारे आले होते. ती मोठमोठे श्वास घेत वर्षाला पाहत होती.

"हे काय बोलतेस वर्षा. कशावरून बोलतेस ?"

"खरं तेच बोलतेय मी.. बघ ना, तुला स्वप्नात काय दिसतंय तर झाडाला लटकलेलं प्रेत. ती व्यक्ती म्हणजे सुरज. ते झाड म्हणजे त्यांची

वनक्षेत्राला लागून असलेली जमीन. मेघा, सुरजच तुझ्या स्वप्नात येतोय." वर्षा तिचा हात धरून बोलत होती.

"नाही वर्षा हे खरं नाही. हे होऊ शकत नाही. अगं ऽ सुरजला जाऊन जवळजवळ वर्ष झालं. यापूर्वी कधी मला अशी स्वप्न पडली नाहीत."

"खरंच असं काही असतं तर अशी स्वप्न मला आधीच पडायला हवी होतीत. मला नाही वाटत, मला पडणाऱ्या स्वप्नांचा आणि सुरजच्या मृत्यूचा काही संबंध असेल म्हणून." मेघा मान नकारार्थी हलवत जमिनीच्या दिशेने पाहू लागली.

"मेघा कदाचित मी सांगितलेल्या गोष्टी पूर्ण तंतोतंत खऱ्या नसतील. पण तुझ्या स्वप्नांचा आणि सुरजच्या मृत्यूचा नक्कीच संबंध आहे. मला सांग, गेले आठ दिवस तुला स्वप्न पडतायत मी कधी हा विषय काढला होता का ?"

"आज योगायोगाने तुझ्याकडून सुरजची माहिती कळाली. तु जे काही सांगितलंस त्यावर माझा विश्वास आहे. तू पण विश्वास ठेव तुला पडणारी स्वप्न, तुला काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत आहे. सुरज तुला काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत आहे. माझं ऐक, एकदा गावी जाऊन ये. मी खात्रीने सांगते, तुला तुझ्या सर्व प्रश्नांची उत्तर कळतील."

मेघा शांतच होती. तिला काहीच कळत नव्हतं.

"असंही तू इथे राहून काय करणार ? मी तुला किती दिवस झाले सांगतेय थोडे दिवस गावी जा.. निसर्गात रहा म्हणून.. तुला आरामाची गरज तर आहेच.. कमीत कमी त्यासाठी म्हणून जा.."

मेघा शांतच होती. ती मोठ्या आशेने तिच्याकडे पाहत होती.

वर्षा क्षणाचाही विलंब न करता तिचा हात धरत म्हणाली, "वाटल्यास मी येते तुझ्या सोबत."

मेघाने होकारार्थी मान डोलावली.

टीव्हीवरचा सिनेमा संपला होता. कोई मिल गया मधला जादू त्याच्या घरी गेला होता. त्याला घरी जायला रोहितने त्याला मदत केली होती.

आता मेघाला तिच्या प्रश्नांची उत्तर शोधण्यात मदत करण्यासाठी वर्षा सज्ज झाली होती.

वर्षाची थेरी खरंच खरी आहे की वास्तविकता काहीतरी वेगळीच आहे हे आता गावी जाऊनच कळणार होतं.

०० 

ठरल्या प्रमाणे वर्षा मेघासोबत तिच्या गावी गेली होती. पाच-सहा तासांचा प्रवास करून दोघी राधानगरीत दाखल झाल्या होत्या. कित्येक दिवसांनी घरी आल्यामुळे मेघाची चांगली विचारपूस केली जात होती. तिच्या आवडीचं जेवण केलं जात होतं.

तिची आई आवडीने तिला आवडणारी शेवग्याची आमटी अन् चुलीवरची भाकरी करत होती. मेघा अन् वर्षा चुलीसमोर बसून गप्पा मारत होत्या. बोलता बोलता मेघाने सुरजच्या आईचा विषय काढला.

"मम्मे, सुरजची आई कशी आहे आता ?"

"हाय की बरी." मेघाची आई भाकरी थापत म्हणाली.

"गावात येते का कधी ?"

"येते की. न यायला काय झालं ? आठ दिवस कुठं दिसल्याली नाही खरं.. नायतर हाक मारल्याशिवाय जात नाही." त्यांनी तव्यावरची भाकरी पलटली.

मेघा अन् वर्षा एकमेकींना पाहत होत्या. वर्षाने तिला नजरेनेच बाहेर जाऊ म्हणून इशारा केला. तशा दोघी पटकन उठून बाहेर गेल्या.

"आपल्याला जायला हवं." वर्षा घाईघाईत बोलू लागली.

"कुठे ?"

"सुरजच्या घरी जिथे त्याचा आत्मा आहे असं म्हणतात."

"आत्ता एवढ्या रात्री."

"होय. काकी काय म्हणाल्या ऐकलंस ना, आठ दिवस त्या दिसल्या नाहीत. नक्कीच काही तरी आहे. आपल्याला जाऊन बघितलं पाहिजे."

"चालेल." तसं म्हणत दोघी सुरजच्या घराच्या दिशेने वळाल्या.

सुरजचं घर गावापासून दोन किमी अंतरावर होतं. वनक्षेत्राची हद्द त्याच्या घरापासून दिडएक किमी अंतरावर होती. पण असं वाटत होत, सुरजच घर जंगलातच आहे की काय.

त्याच्या घराच्या आजूबाजूला घनदाट झाडी होती. त्याच्या घराजवळ पोचताच मेघा भितीने थरथरू लागली. समोरचं दृश्य तिनं तिच्या स्वप्नात पाहिलं होतं.

समोर एक मोठंच्या मोठ झाड होतं. ते झाड पूर्णपणे सुकून गेलं होत. त्याची पानं गळून पडली होती. खोडापासून ते अगदी फांद्यांपर्यंतचा भाग सुकून गेला होता.

झाडाच्या अवतीभोवती सुकलेल्या फांद्या पडलेल्या होत्या. काही मोडक्या तोडक्या लाकडी वस्तू झाडाच्या भोवती गोल करून रचून ठेवल्या होत्या.

झाडाच्या पायथ्याशी बारीक सारीक लाकडांचे तुकडे गोलाकर अवस्थेत पडलेले होते अन् त्यावर पालापाचोळा पडलेला होता. ते झाड म्हणजे होळीसाठी केलेली बांधणी वाटत होतं.

त्या भयानक दिसणाऱ्या झाडामागे सुरजच घर लपून बसलं होतं.

"हेच वर्षा.. हेच झाड दिसतं मला स्वप्नात.." मेघा घाबरत घाबरत बोलू लागली.

"म्हणजे माझा अंदाज बरोबर होता. मेघा तो सुरजच आहे. तुझ्या स्वप्नात येणारा मुलगा सुरजच आहे. तोच तुला इथे बोलवत होता."

"पण का वर्षा ? का बोलावतोय तो मला ? आणि इतक्या महिन्यानंतर का ? मलाच का ?"

"ते माहित नाही मेघा. तेच माहित करून घेण्यासाठी आपण इथे आलोय. आणि राहिला प्रश्न तुझा तर तू प्रेयसी होतीस त्याची. तुझ्याकडून त्याची काहितरी अपेक्षा असेल. एखादी इच्छा त्याला पूर्ण करायची असेल."

"कसली इच्छा ?" मेघा चिंतेत गेली होती. वर्षा आसपासचा परिसर पाहत होती. रात्रीच्या अंधारात तिथली जागा अजूनच भितीदायक वाटत होती. ते भलंमोठं झाड विचित्र दिसत होतं.

हळूहळू तिथल्या वातावरणात बदल जाणवू लागला. वारा जोरात वाहू लागला. खाली पडलेला पालापाचोळा वाऱ्यासोबत उडू लागला. धुळीचे कण गोलगोल फिरु लागले.

"हे काय होतय वर्षा.." मेघा घाबरत घाबरत बोलू लागली, "आपल्याला काही होणार तर नाही ना ?"

"घाबरू नकोस मेघा मला खात्री आहे काही होणार नाही. दुर्लक्ष कर या गोष्टींकडे. आपण ज्या कामासाठी आलोय त्यावर लक्ष दे." तसं म्हणत, वर्षा सुरजच्या घराच्या दिशेने चालू लागली.

सुरजच घर बंद होतं. त्यांनी दगडाने कुलूप मोडलं. घरात जाऊन त्या घराची झडती घेऊ लागल्या.

"वर्षा आपण शोधतोय तरी काय ?"

"पुरावा मेघा जो सुरजच्या आत्महत्येशी निगडित असू शकतो किंवा कोणत्याही गोष्टीशी."

"पण इथे असं शोधण्यासारखं काहीच नाही वर्षा. सर्व उघड्यावर आहे. साधा पेपरसुद्धा नाही."

"तेच तर मला कळत नाहीये. नेमकं काय झालंय या ठिकाणी. वर्षा मेघाकडे पाहू लागली, मेघा तू आठव तुला आणखी काही दिसत होतं का स्वप्नात. अशी एखादी जागा, वस्तू किंवा काहीही. आठवण्याचा प्रयत्न कर."

"नाही वर्षा. काहीच नाही. मला फक्त ते भयानक झाड आणि त्यावर लटकणारं प्रेत इतकंच दिसत." मेघा बारीक आवाजात सांगू लागली.

वर्षा जमिनीच्या दिशेने पाहू लागली अन् बोलू लागली, "मग काय असू शकतं मेघा ? काही तरी आहे जे सुरज तुला सांगण्याचा प्रयत्न करतोय. पण

काय आहे ते ? काय असू शकतं ते ?" ती बोलत बोलत पुन्हा घराबाहेर आली. मेघा तिच्या मागोमाग गेली.

झाडाच्या परिसरात वर्षा काहीतरी शोधण्याचा प्रयत्न करू लागली.

"मेघा फक्त झाड दिसतंय बरोबर ?"

"हो."

"आणि लटकलेलं प्रेत. झाड म्हणजे ही जागा. ते प्रेत म्हणजे सुरज. काय अर्थ असू शकतो या गोष्टीचा." वर्षा एकटीच बडबडू लागली.

"मेघा सुरजची बॉडी मिळाली होती ना ?" वर्षा एकदम दचकून तिला विचारू लागली.

"हो. लोकं म्हणतात, याच झाडावर त्याने आत्महत्या केली होती."

"तू त्याला त्या अवस्थेत पाहिलं होतं ?"

"नाही. मी नव्हत पाहिलं. मी नव्हतेच तेव्हा इथे."

"काय..?"

"हो."

"कदाचित त्याला तुला पाहायचं असेल म्हणून तर तो असे संकेत देत नसेल ना ?"

"म्हणजे. ?"

"इथे त्याचा आत्मा आहे असं म्हणतात. कदाचित त्याला मुक्ती हवी असेल. त्याला तुला पाहायचं असेल म्हणून तर तो असे संकेत देत नसेल कशावरून ?"

"मला काही कळत नाही वर्षा. मला काहीच कळत नाही." मेघा डोळ्यात अश्रू आणून उभी होती. वर्षा पूर्ण गोंधळलेल्या अवस्थेत होती. तिला आता काय करायचं तेच कळत नव्हतं.

"आपण जाऊया इथून वर्षा. मला आता खूप भिती वाटतेय." मेघा बारीक आवाजात बोलू लागली. वर्षाने होकारार्थी मान डोलावली अन् त्या पाठीमागे वळाल्या.

वातावरण आणखी खराब होऊ लागलं. वाऱ्याचा वेग वाढला. धुळीचे कण आणखी जोरात फिरू लागले. दोघींनी घाबरून एकमेकींचा हात धरला अन् चालू लागल्या.

"मेघा मला अजूनही चुकीचं वाटतंय. असं वाटतंय आपल्याला काहीतरी संकेत मिळतोय पण तो आपल्या लक्षात येत नाहीये."

मेघा शांतपणे ऐकत होती. ती पूर्णपणे घाबरून गेली होती.

"मेघा तुझ्या व्यतिरिक्त सुरजचं आणखी कोणी मित्र किंवा मैत्रीण होती का ?"

"नाही वर्षा. त्याची मीच एकमेव मैत्रीण होते. त्याने फक्त माझ्यावर प्रेम केलं होतं. त्याची आई सोडता दुसऱ्या कोणावर विश्वास तो ठेवू शकत होता तर ती फक्त मी होते."

"आई."

"हो आई."

वर्षा एकदम थांबली. तिला काहीतरी लक्षात आल्यासारखं झालं.

"सुरजची आई कुठे गेली मेघा. आपण तिला पाहायला आलो होतो. पण ती नाहीये इथे. कुठे गेली असेल ती. काकी म्हणत होत्या आठ दिवस दिसली नाही. आणि तुला स्वप्न पण आठ दिवसांपासून पडतायत." वर्षाने एकदम डोळे मोठे केले.

मेघाच्याही पटकन काहीतरी  लक्षात आलं. ती मोठमोठ्याने श्वास घेऊ लागली. तिच्या अंगावर शहारे आले होते.

"हो बरोबर."

वर्षा पटकन मागे वळाली अन् झाडाजवळ जाऊन उभी राहिली. खाली वाकून तिथली लाकडं बाजूला सारू लागली.

तोच त्यांना एक लाकडी पेटारा दिसू लागला. दोघींनी मिळून त्यावरची धूळमाती बाजूला सारली अन् तो पेटारा उघडला.

एक बाई होती. मेघा अन् वर्षा दोघी आश्चर्याने एकमेकींना पाहत होत्या.

"सुरजची आई आहे." मेघा डोळयात पाणी आणून म्हणाली.

वर्षाने त्यांची पल्स चेक केली. त्यांना उठवण्याचा प्रयत्न केला. दोघींनी मिळून त्यांना पेटाऱ्यातून बाहेर काढलं. त्या शुद्धीवर येत नव्हत्या.

"मेघा घरी फोन कर. कोणाला तरी बोलव. यांना त्वरीत दवाखान्यात नेलं पाहिजे." मेघाने क्षणाचाही विलंब न करता फोन केला.

०० 

सुरजच्या आईला शुद्धीत यायला चौदा-पंधरा तासांची वाट पहावी लागली होती. या वेळेत गावात बराच गोंधळ उडाला होता.

वर्षाचा अंदाज खरा ठरला होता. दोघीही सुरजची आई शुद्धीत येण्याची वाट बघत होत्या अन् अखेर त्यांना शुद्ध आली होती.

"काकी कशा आहात आता ? मला ओळखलं मी मेघा." मेघा त्यांच्याजवळ जात त्यांची विचारपूस करू लागली.

त्यांनी तिचा हात हातात घेतला अन् मानेने होकार दिला.

"काकी, कोणी केलं हे ?" मेघाने दिर्घ श्वास घेत विचारलं.

"आम्ही तुमच्या सोबत आहोत काकी. घाबरू नका. त्या नराधमाला चांगली शिक्षा दिल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही."

सुरजची आई शांत होती. तिचे डोळे पाण्याने भरले होते. तिच्या थरथरणाऱ्या ओठांनी ती बोलू लागली, "ती नराधम मीच आहे बाळा."

मेघा अन् वर्षा आश्चर्याने एकमेकींकडे पाहू लागल्या. त्यांच्या पायाखालची जमीन सरकली. मेघा थक्क होऊन मागे सरली.

वर्षा पुढे होऊन बोलू लागली, "काकी, घाबरू नका. तुम्हीं आता सुरक्षित आहात. तुम्हीं खरं काय ते सांगू शकता. आपण त्या लोकांना शिक्षा देऊ."

"मला कोणी मारण्याचा प्रयत्न केला नाही बाळा. मीच स्वत:ला संपवण्याचा प्रयत्न करत होते." सुरजची आई वर्षाचा हात धरत म्हणाली.

"हे शक्य नाही काकी. तुम्ही स्वत: कसं काय पेटीत डांबून घेऊ शकता. का घाबरताय. सांगा ना खरं."

"नाही बाळा. मी खरं बोलतेय. मला कोणी मारण्याचा प्रयत्न केला नाही. हे सगळं मीच केलंय."

"कसं काय ? कसं शक्य आहे ते ? मला नाही पटत. तुम्ही असं वागू शकत नाही." मेघा पुढे येत म्हणाली.

सुरजची आई शांत स्वरात बोलू लागली, "का मेघा, मी का असं वागू नये सांग बरं.. जगून तरी काय करायचं होतं मी.. कोणासाठी जगायचं होतं. कोण राहिलं आता माझ्या आयुष्यात." बोलता बोलता त्यांचे डोळे भरून आले.

"तरण्याताठ्या मुलाने आयुष्य संपवून घेतलं. त्यापाठोपाठ नवरा सोडून गेला. मी तरी का जगायचं मग ? कुणासाठी जगायचं ? देवानं मला तरी का जिवंत ठेवलं ?"

"एकटं राहून राहून माणूस किती दिवस एकटा राहणार ? आयुष्य घालवायला कुणाची सोबत नको का ? त्यांनी तसं म्हणताच दोघींचे डोळे भरून आले. अंगावर शहरा आला.

"कितीदा मी स्वत:ला संपवायचा प्रयत्न केला पण काहीतरी आडवं यायचंच. यावेळी पण पुन्हा तेच झालं."

"मी स्वत:च ती चिता आठ दिवसापासून रचत होते. सुताराच्या सदानानाला म्हटलं, दुपारच्याला येऊन ती झाड पेटवून टाका. तुमची आणि कायबाय लाकडं असतील तर भवतीनं मांडा. माझी वाट बघू नका. मी असले नसले तरी झाड पेटवून टाका."

"सदानानाला निरोप देऊन मीच त्या पेटाऱ्यात जाऊन बसले. सदानानाला यातलं काहीच माहित नाही. तो दुपारच्या वेळी निम्मी लाकड टाकून गेला अन् आलाच नाही.. कुठं राहिला कुणास ठाऊक." काकी डोळे पुसत त्यांना सांगू लागल्या.

"चुकीचं वागलात काकी. तुमच्याकडून अशी अपेक्षा नव्हती." मेघा त्यांचा हात धरून बोलू लागली.

"दुसरा पर्यायच उरला नाही पोरी माझ्याकडं. पण तुम्ही कसं काय आलात. तुम्ही कसं मला शोधून काढलं." सुरजची आई प्रश्नार्थक नजरेने विचारू लागली.

"निरोप काकी. आम्हांला कोणाचा तरी निरोप आला होता." वर्षा त्यांच्या नजरेला नजर देत म्हणाली.

"निरोप, कोणाचा निरोप. त्याला तरी कसं कळालं ? कोण आहे तो ?" काकी अवाक होऊन पाहत होत्या. त्या दोघीही काही क्षण शांतच होत्या.

"काकी, तुम्हीच म्हणालात ना," मेघा त्यांचा हात हातात घेत बोलू लागली, "तुम्ही बऱ्याचदा स्वत:ला संपवण्याचा प्रयत्न केलात पण काही ना काही अडथळा यायचा, बघा यावेळी पण असंच काहीतरी झालं. याचा अर्थ असा आहे की कोणी तरी आहे ज्याला वाटतंय तुम्ही हे चुकीचं करताय. म्हणून तोच तुम्हांला अडवतोय. त्याचा संकेत ओळखा." मेघाने तसं म्हणताच त्यांचे डोळे भरून आले.

"सुरज.." त्या थरथरत्या ओठांनी म्हणाल्या.

"काकी, जगासाठी तो गेला असेल. पण तुमच्यासाठी तो अजून आहे. तुम्ही त्याला अजून धरून ठेवलंय. त्याला आता मुक्तीची गरज आहे काकी.

तुम्ही सुद्धा असं स्वत:ला संपवण्याचा प्रयत्न करू लागलात तर तो कसा जाईल. त्याला कशी मिळेल मुक्ती सांगा बघू."

"काकी आम्ही असं अचानक तुम्हांला येऊन वाचवू शकलो नसतो. मला एक निरोप आला होता काकी." मेघा बोलताना तिच्या अंगावर शहारे येत होते.

"त्या निरोपाचा अंदाज लावत आम्ही तुमच्यापर्यंत पोहोचलो आहोत. आणि आता आमचा अंदाज खरा ठरला आहे."

"काकी सुरजला मुक्तीची गरज आहे. तुम्हांला असं दु:खी ठेवून तो जाऊ शकत नाही. तुमचं वाईट झालेलं त्याला पाहवणार नाही. तुम्ही त्याला मुक्त करा काकी. तुम्ही हे असे प्रयत्न पुन्हा करू नका." मेघा त्यांना हात जोडत विणवणी करू लागली.

सुरजची आई एकसारखी रडत होती.. तिने मेघाच्या गळ्यात पडून आपलं दु:ख वाहायला सुरवात केली होती अन् थरथरत्या ओठांनी ती बोलत होती, "मी असं पुन्हा करणार नाही. मी माझ्या सुरजला मुक्त करीन. मी माझ्या सुरजला मुक्त करीन. त्याला सांग त्याचा अखेरचा निरोप माझ्यापर्यंत पोहोचला." त्यांना रडताना पाहून मेघा अन् वर्षाचे पण डोळे भरून आले होते.

०० 

आपल्यावर वाईट परिस्थिती येते तेव्हा ती का येते हे आपल्याला कळत नसतं. त्यामागचा हेतू आपल्याला तेव्हा कळत नसतो. पण त्या वाईट परिस्थितीवर मात करून जेव्हा आपण खंबीरपणे उभे राहतो तेव्हा तो हेतू स्पष्ट होतो.

सुरजच्या आईबाबतीतही असंच काहीस झालं. त्यांनी दु:खावर मात केली. नव्या आयुष्याला सुरवात केली. नव्या संघर्षाला सुरवात केली.

त्यांनी वस्तीतलं घर विकून पुण्यात एक जागा विकत घेतली. मतिमंद मुलांसाठी छोटीशी प्राथमिक शाळा उभी केली. यासाठी त्यांनी सरकारची मदत तर घेतलीच पण मेघा अन् वर्षाने सुद्धा खुशीने त्यांना आर्थिक मदत केली.

आज त्या सर्व मुलांना घेऊन वाडीतल्या घरी आल्या होत्या. सुरजच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी सर्वांसाठी चांगली मेजवाणी आयोजित केली होती. त्या लहान मुलांसोबत बागडताना त्या फार आनंदी दिसत होत्या. मेघा अन् वर्षा त्यांना आनंदाने पाहत होत्या.

"कसं असतं ना मेघा आयुष्य.. जी बाई आत्महत्या करायला निघाली होती ती बघ आज किती आनंदी दिसतेय."

"होय. थँक्यू वर्षा. हे सगळं तुझ्यामुळे झालंय."

"नाही मेघा.. हे मी केलं नाही. हे तु सुद्धा केलं नाहीस.. हे आपल्याकडून एका मुलाने करून घेतलं आहे. त्याच्या आईसाठी त्याने केलं आहे. त्याचा

तो निरोप त्याने स्वप्नाद्वारे तुला सांगितला नसता तर आपण काहीच करू शकलो नसतो."

"नवल वाटतं मला, आपल्या आवडत्या व्यक्तीची आपण आठवण काढली की लगेच त्याचा फोन येणं किंवा ती समोर हजर होणं यातून आपलं बाँडिंग आपल्याला कळतं. पण एखाद्या मृत व्यक्तीने, एका आत्म्याने असा संकेत देण म्हणजे.. खरंच, अजून नवल वाटतं."

"हे आपलं शरीर काहीच नाही. आपलं नातं कधीच कुठल्या शरीराशी जोडलं जात नाही. आपलं नातं हे अंतर्मनाशी जोडलं जातं अन् सुरजने ते आपल्याला शिकवलं मेघा."

"हो ना.. खरंच.. तरीपण तुझे आभार वर्षा.." मेघा तिचा हात धरत बोलू लागली, "पण वर्षा तुला या गोष्टी पटकन पटकन कशा लक्षात आल्या. मला तर काहीच कळत नव्हतं."

"मेघा फक्त एक दोन मार्कांत माझी युपीएससी चुकली आहे गं ऽ नाही तर पोलिसांत असणारे सगळे डिटेक्टिव्हचे गुण माझ्यात आहेत." तसं म्हणत ती हसू लागली.

"हो का.." तसं म्हणत मेघा तिच्या पोटाला गुदगुल्या करू लागली. वर्षा जोरजोरात हसू लागली.

"मग ती रूमवर पडलेली सगळी रहस्यकथांची पुस्तकं देऊन टाकू ना आपण रद्दीत. कशाला हवीत ती आरशातलं प्रेम वगैरे सारखी पुस्तकं."

"ए तसं म्हणू नकोस, पुस्तकं म्हणजे जीव की प्राण आहेत. त्यांची जागा रद्दीत नसते, आपल्या काळजात असते." तशी वर्षा नाटकी हावभाव करत बोलू लागली.

"आली मोठी डिटेक्टिव." मेघा तिच्या पाठीवर थाप मारत हसू लागली. दोघीही हसत हसत समोर खेळणाऱ्या मुलांना पाहू लागल्या.

नकळत मेघाचं लक्ष त्या समोरच्या झाडाकडे गेलं. ते झाड आता सुकलेलं दिसत नव्हतं. त्याच्या पायथ्याशी आता नवी पालवी फुटलेली दिसत होती. खोडापासून वर फांदीपर्यंतचा भाग हिरवागार होत चाललेला दिसत होता.

त्या झाडाला त्याचं रूप बदलताना पाहून तिला निसर्गाचा निरोप सुद्धा मिळाला होता.

वेळ बदलते.. परिस्थिती बदलते.. एक गेला की दुसरा त्याची जागा घेतो.. आपण फक्त जगत राहायचं.. निसर्गचक्र त्याचं काम करत राहतं.. आपण फक्त जगत राहायचं..

०००० 

# मूर्तिकार

प्रेमाच आणि थंडीच वेगळंच नातं आहे. थंडीचा महिना आला की प्रेमाच वार जास्तच जोराने वाहू लागतं. प्रेमाची गाणी मनभरून ऐकू वाटतात. नव्या नव्या लोकांशी मैत्री करू वाटते.

अन् जर का आपण पौगंडावस्थेत असू तर मग काही बोलायलाच नको. गुलाबी थंडी अंगावर रोमांच आणते अन् मनात, शरीरातल्या नसानसात गुलाबी विचार भरून जाते.

माझी सुद्धा हीच अवस्था होती. तारुण्यात प्रवेश केला होता. ओठावर बारीक मिश्या आल्या होत्या. हनुवटीवर बारीक बारीक दाढी उगवत होती. एखाद्या तरुण मुलीकडे पाहिलं की नकळत अंगावर रोमांच येत होता.

नुकतंच कॉलेजला जायला लागलो होतो. माझ्या सर्व मित्रांना प्रेयसी होती. मैत्रिणींना प्रियकर होते. काही माझ्यासारखे एकटे होते पण त्यांनीही मैत्रिणी बनवल्या होत्या अन् प्रेयसी होण्याच्या त्या वाटेवर होत्या.

मला मैत्रिणी नव्हत्या अशातला भाग नव्हता. मुळातच मी श्रीमंत असल्याने मला मैत्रिणी बनवाव्या लागत नव्हत्या. त्या आपसूक बनत होत्या.

ऐन जवानीत मी माझ्या इच्छा आकांक्षा पुऱ्या केल्या होत्या. पोटासोबतच शरीराची भूक भागवायला मी मागे पुढे पाहत नव्हतो. मैत्रीचे संबंध एकांतात घेऊन जाण्यात तर मी पटाईत होतो.

एखादं खेळणं वापरून झालं की कसं मन नव्या खेळण्याकड वळत तसंच माझंही होतं. नव्या नव्या लोकांशी भेटून त्यांच्याशी मैत्री करायला मला आवडत होतं. कायम मी नव्या लोकांच्या शोधातच असायचो.

त्यातच एके दिवशी माझी ओळख अहिल्येशी झाली.

फुटपाथच्या कडेला मातीच्या मुर्त्यांची रांग लावून बसलेली एक मुलगी माझ्या नजरेस पडली अन् मी तिला पाहतच राहिलो. न कळत तिच्याकडे आकर्षित झालो. तिचं तारुण्यातलं यौवन पाहून माझ्या शरीरात वीज चमकली.

तपकिरी रंगाच्या कपड्यांत तिचं भरलेलं शरीर मनाला मोहित करत होतं. तिचा सावळा रंग तिला शोभत होता. केसांच्या बटा तिच्या गालावर रेंगाळत होत्या. तिच्या गालावर पडलेल्या खळया तिच्या सौंदर्यात भर घालत होत्या.

मी चांगला मिनिटभर तिला पाहत होतो. तिच्या शरीराच्या प्रत्येक भागाचं बारकाईने निरीक्षण करत होतो. मला असं थांबलेल पाहून गौतम गोंधळून गेला.

“काय रे काय झालं असा का थांबलास ?”

मी शुद्धीवर येत बोलू लागलो, “चल मुर्त्या पाहू. चांगल्या दिसत आहेत. एखादी घेऊ.” आम्ही दोघेही तिच्या जवळ गेलो.

गौतम मुर्त्या पाहत होता अन् मी मूर्तिकाराला पाहत होतो.

“काय देऊ साहेब ?” आम्ही येताच त्या कोकिळेने आमची विचारपूस केली अन् त्या मंजुळ आवाजाने माझ्या काळजात चर्र ऽ झालं.

“साहेब नका म्हणू, तुमच्या वयाचा आहे मी. इंद्रजीत नाव आहे माझं.” मी हात केसांवरून फिरवत बोलू लागलो. तिच्या निळया डोळयांची माझ्या घाऱ्या डोळयांसोबत नजरानजर झाली.

"कशा दिल्या मुर्त्या ?" मी तिच्या नजरेला नजर देऊन विचारलं.

"कोणत्या हव्या आहेत ?"

मी मूर्त्यांवर नजर फिरवली.

निरनिराळया प्रकारच्या तिथे मुर्त्या होत्या. सर्व मातीच्या. आकाराने तळहाताएवढ्या पण अगदी सुबक, रेखीव. अगदी खऱ्या माणसाच्या

वाटाव्या अशा मुर्त्या. मला एका मुलीची मूर्ती आवडली अन् मी त्यावर बोट ठेवलं.

"ही कशी दिली ?"

"ती अजून तयार नाही. अजून तिचं फिनिशिंगच काम बाकी आहे."

"मग इथे का ठेवली आहे ?"

"सँपल म्हणून."

मी शेजारच्या मूर्तीवर बोट ठेवत विचारलं. “आणि ही.”

"ती सुद्धा. त्या रांगेतल्या सर्व मुर्त्या अजून तयार नाहीत."

"सर्व..?"

"हो."

"मग तयार मूर्ती कोणती आहे ?"

"या वरच्या आहेत ना.. यातल्या घेऊ शकता तुम्ही." तिने मुलांच्या अन् माणसांच्या मूर्त्यांवर इशारा करत सांगितलं.

"मुलांच्या आणि माणसांच्या कोण घेणार." मी पटकन म्हणालो. तशी ती गालात हसली. गौतमने मला हाताने डीवचलं.

"नाही म्हणजे माझ्या भाचीसाठी घ्यायची होती. तिला नाही आवडणार." मी सुद्धा गालात हसत तिला पाहिलं.

"दोन दिवसांनी घेऊ शकता तुम्ही. तोपर्यंत तयार होतील."

"म्हणजे आम्ही पुन्हा दोन दिवसांनी येऊ." मी तिला हसत विचारलं.

"आवडली असेल तर येऊ शकता. मी तुमच्यासाठी दुसऱ्या कोणाला विकणार नाही." ती नजर चुकवत गालावर हसू ठेवत म्हणाली. मी तिला हसऱ्या नजरेने पाहतच राहिलो. गौतम आम्हा दोघांकडे बघत होता.

"दोन दिवसांनी तर येऊच पण आता घेण्यासारख काय आहे तुमच्याकडे ?" मी तिच्या नजरेला नजर देत विचारल.

तिने काहीच न बोलता बाकीच्या मुर्त्यांवर इशारा केला.

"त्या मुर्त्या सोडून."

"मग पुस्तकं आहेत." तिने शेजारच्या स्टॉलवर इशारा केला.

"तो स्टॉल पण तुमचा आहे ?"

"हो."

आम्ही दोघेही तिकडे वळालो. ती आमच्या मागेमागे आली. मी पुस्तकं पाहू लागलो. त्यातली बऱ्यापैकी पुस्तकं मी वाचली होती. मी फक्त पुस्तक चाळत होतो. गौतम भयकथांची पुस्तकं पाहत होता. धारपांच्या वाचलेल्या पुस्तकांची यादी काढून तो आता कोणती वाचायची बाकी आहेत ते पाहत होता.

मी प्रेम कथेची पुस्तकं पाहू लागलो तोच तिने प्रेमावरची पुस्तकं माझ्या समोर ठेवलीत.

"वाचली आहेत मी.. काहीतरी नवीन सुचवा.." मी गालावर बारीक हसू ठेवत म्हणालो.

तिने माझ्यावरून नजर न हटवता दुसरं पुस्तक समोर ठेवलं.

मी तोंडाचा चंबू करत नकारार्थी मान डोलावली. "ही अशी लहान मुलांची प्रेमावरली पुस्तकं नको.. काही तरी सस्पेन्स, थ्रिलर असेल तर दाखवा."

"डोन्ट जज अ बुक बाय इट्स कव्हर.." ती नटखट हसत पाहू लागली.

मी तिला पाहतच राहिलो. "पुस्तक वाचायची आवड आहे वाटतं तुम्हाला."

"खूप.."

"विशेष काय आहे यात ?"

"प्रेम व्यक्त करण्यापूर्वीच आलेला दुरावा आणि त्यानंतर निर्माण होणाऱ्या रहस्यमय घटना."

मी गालावर हसू ठेवून पाहतच राहिलो अन् म्हणालो, "द्या कितीला आहे..?"

तिने एका हाताने माझा हात धरला अन् दुसऱ्या हाताने पुस्तक माझ्या हातात ठेवलं अन् म्हणाली, "माझ्याकडून वाचायला म्हणून घेऊन जावा.. दोन दिवसांनी मूर्ती घ्यायला याल तेव्हा पुस्तक आवडलं असेल तरच पैसे द्या."

तिचं असं बेधडकपणे वागणं मला आवडलं. मी तिला फक्त पाहत होतो. ती माझ्या नजरेला नजर देऊन एकटक मला पाहत होती.

नकळत तिच्या झालेल्या स्पर्शाने माझ्या शरीरातून विजेची लहर गेली. अन् मी करंट लागल्यासारखा एकटक तिला पाहू लागलो. मला तिला पुन्हा स्पर्श करायचा होता. तिचा हात थंड होता. ओल्या मातीला हात लावावा असा. नुकत्याच तयार होत असणाऱ्या ओल्या मातीच्या थंड मूर्तीला हात लावावा असा. मी त्या थंडाव्यात थंड पडलो.

गौतमने आवाज दिला तेव्हा कुठे मी शुद्धीवर आलो. त्याने नारायण धारपांची बरीच पुस्तकं विकत घेतली होती. तिला पाहत पाहतच आम्ही तिथून निघालो.

घरी येऊन आधी पुस्तक वाचायला घेतलं. पण त्या मुलीचा चेहरा डोळ्यासमोरून जात नव्हता. तिचं आकर्षकरित्या डुलणारं शरीर माझ्या नजरेसमोरून जात नव्हतं. मी पुस्तक तसंच बाजूला ठेवलं अन् झोपी गेलो.

जागेपणी पण तिच दिसत होती अन् स्वप्नात पण तीच दिसत होती. तिच्यासोबतचे प्रणयप्रसंग कल्पून माझी मती काम करेनाशी झाली होती. मला तिला पुन्हा भेटायची इच्छा होत होती. तिचा नकळत झालेला स्पर्श मला हवाहवासा वाटत होता. मी फ्रेश होऊन पुन्हा त्या फुटपाथजवळ गेलो.

ती मुलगी तिथे नव्हती. कोणीतरी एक माणूस त्या स्टॉलवर बसला होता. मला पाहताच तो मला काय हवंय हे विचारू लागला.

मी नकारार्थी मान डोलावली अन् तिथल्या मुर्त्या पुन्हा न्याहाळू लागलो. काही वेळ मी तिथे थांबून तिची वाट पाहिली पण ती काही आली नाही. मी जायला निघणार तोच माझी नजर तिथल्या आरशावर पडली.

आरशात मला एक मूर्ती दिसली. हुबेहुब तिच्यासारखी. मला झालेलं नवं प्रेम मी आरशात पाहिलं. आरशातल्या त्या मूर्तीला पाहून मला तिने दिलेल्या पुस्तकाची आठवण आली.

योगायोगच होता, मी हलकसं गालात हसलो.

मी ती मूर्ती हातात घेतली अन् थक्क होऊन ती मूर्ती पाहू लागलो. ही अशक्य गोष्ट होती. त्या मुली सारखी हुबेहुब दिसणारी मातीची मूर्ती माझ्या हातात होती.

तेच तपकिरी रंगाचे कपडे, तोच सावळा रंग, निळे डोळे, गालावर पडणारी खळी आणि तोच थंड करणारा स्पर्श.

अशक्य होतं हे. अगदी हुबेहुब एखाद्या व्यक्तीची अशी मूर्ती तयार करण म्हणजे काही सोपं काम नव्हतं.

मी त्या माणसाला विचारू लागलो, "काका या मुर्त्या कोण तयार करतं?"

"का ?" त्यांनी प्रश्नार्थक नजरेने विचारलं.

"खूप छान आहेत. अगदी जिवंत वाटतात."

त्यांनी हसत उत्तर दिलं, "माझी मुलगी तयार करते. मूर्तिकार आहे ती."

"अच्छा. कुठे असतात त्या ?"

"इथेच असते."

"ओके. आता येणार आहेत. मला त्यांना भेटून सांगायचं होतं." मी उत्साह दाखवत बोलू लागलो.

"नाही. ती वर्कशॉपमध्ये आहे. कामाचा व्याप वाढला आहे ना.. दोन चार दिवस तरी येणार नाही."

"ओके."

"लांब आहे का तुमचं वर्कशॉप ?"

"हो." काका जरा अडखळत बोलू लागले, "तुम्ही काय करता ?"

"कॉलेज स्टूडंट." मी पटकन उत्तर दिल. "काका ही मूर्ती मला हवी आहे. किती द्यायचे पैसे ?"

"नाही नाही.." काका एकदम घाबरून गेले आणि त्यांनी ती मूर्ती माझ्या हातातून घेतली.

"ही विकण्यासाठी नाही."

मी त्यांना पाहतच राहिलो.

"का..? तयार नाही का अजून..? अजून फिनिशिंग बाकी आहे का..?" आता काका मला पाहत होते.

"नाही तसं नाही. ही फक्त शो साठी आम्ही ठेवतो. विकत नाही. तुम्हाला दुसरं काही पाहिजे असेल तर घ्या."

मी गंभीर नजरेने त्यांना पाहू लागलो. त्यांचे अचानक बदललेले हावभाव माझ्या मनात शंका निर्माण करत होते.

"नाही दुसरं काही नको मला. थँक्यू.." मी तसाच तिथून निघालो.

काही अंतरावर जाऊन मी थांबलो. फुटपाथजवळ घडणाऱ्या घडामोडींचं निरीक्षण करू लागलो.

मला त्या मुलीला भेटायचं होत. तिच्याशी ओळख वाढवायची होती. मैत्री करायची होती. पण काकांच्या म्हणण्यानुसार ती चार दिवस इथे येणार नव्हती. तिच्या वर्कशॉपला जाऊन भेट द्यावी हे मी ठरवलं.

त्यांच वर्कशॉप कुठे आहे हे मला माहीत नव्हतं पण ते लांब नाही हे मी काकांच्या बोलण्यावरून ओळखलं होत. मी तिथेच थांबून त्यांच्या निघण्याची वाट पाहू लागलो. अंधार होत गेला तसे ते आवरू लागले. त्यांनी मुर्त्या हातगाडीवर ठेवल्या आणि पुस्तकांच्या स्टॉलवर ताडपत्री बांधली.

गाडी ढकलत ढकलत ते चालू लागले मी त्यांचा पाठलाग करू लागलो. थोड्याच अंतरावर चालत गेल्यावर ते एका चिंचोळया गल्लीत घुसले. ती गल्ली माझ्या ओळखीची होती.

माझ्या कॉलेजच्या वाटेवर ती गल्ली होती. पण त्या वाटेने आम्ही कधी जात नव्हतो. कारण ती खाडीची वाट होती. त्या वाटेवर जास्त वस्ती नव्हती. खाडीचा भाग असल्याने त्या ठिकाणी घाणच जास्त होती.

सहसा अश्या गलिच्छ भागात मी कधी गेलो नसतो पण त्या मुलीचा हवाहवासा स्पर्श मला तिकडे खेचून नेत होता.

मी तसाच चालत राहिलो. आज काहीही झालं तरी तिला भेटायचं आणि तिचा नंबर घ्यायचा एवढ मी ठरवलं होतं. मला ती आवडली होती. तिला पाहिल्यापासून मला दुसरं काही दिसत नव्हतं.

अप्सरेसारख्या त्या मेनकेनं माझ्यावर तिच्या सौंदर्याची मोहिनी घातली होती. तिच्या एका स्पर्शासाठी माझं मन चलबिचल होत होतं. कधी जाऊन तिला भेटतोय असं मला होत होतं.

बघता बघता काका मला दिसेनासे झाले. मी माझ्या विचारात क्षणभर हरवून काय गेलो काकांनाच हरवून बसलो.

चिंचोळया गल्लीतून मी चालू लागलो. खाडीचा रस्ता सुरू झाला होता. मला समोर फक्त अंधार दिसत होता.

माझ्या उजव्या बाजूला खाडी होती अन् डाव्या बाजूला घनगर्द झाडी होती. रस्त्यावर लोकांनी कचरा फेकलेला होता. त्याचा उग्र वास माझ्या नाकातले केसं जाळत सर्रकन गेला.

मी मोबाईल काढला पण काही फायदा झाला नाही. त्याने केव्हाच बंद होऊन लायकी दाखवली होती. मी चालत राहिलो.

सोबतीला अंधार होता. कानात किर्र ऽ करणारा रातकिड्याचा आवाज होता. इच्छा नसताना नाकात घुसू पाहणारा उग्र वास होता. तरीही चालत होतो कारण मनात एक इच्छा होती अन् ती लवकरात लवकर पूर्ण करायची लालसा निर्माण झाली होती.

चालता चालताच मी थांबलो. कारण रातकिड्याचा आवाज एकदम थांबला. कचऱ्याचा उग्र वास येईनासा झाला.

मला समोर अंधारात काहीतरी पुसटसं दिसू लागलं. माझ्या काळजात भितीची चमक भरली अन् पायाखालची जमिन निसटली. मला भूताचा

भास झाला अन् मी तिथून पळ काढणार तोच मला तो मंजूळ आवाज ऐकू आला.

"इंद्रजित.."

मी जागीच थांबलो. हा तिचाच आवाज होता. मी मागे फिरलो. ती बरोबर माझ्या समोर उभी होती. तिच्यात आणि माझ्यात हातभर अंतर होतं.

"तू आलास." तिने फार गोड आवाजात विचारलं अन् मी तिथेच घायाळ झालो. क्षणाचाही विलंब न करता, कशाचाही विचार न करता मी तिला कडकडून मिठी मारली.

तिच्या थंडगार मिठित मी थंड पडलो. तिच्या शरीराचा मी सुगंध घेऊ लागलो. पहिला पाऊस पडल्यावर ओल्या मातीचा सुगंध यावा असा तिचा सुवास होता. मी तो माझ्या शरीरात भरू लागलो.

तिचे कोमल केस माझ्या गालांना गुदगुल्या करू लागले. तिच्या चिनी मातीसारख्या कोमल अन् लवचिक शरीरस्पर्शाने माझ्या शरीरातल्या नसा-नसातून अन् रंध्रारंध्रातून विजेची लहर गेली.

मी काही क्षण तसाच तिच्या मिठित राहिलो. माझं बलदस्त शरीर तिच्या भारदस्त छातीशी लावून मी त्या मोहक क्षणांचा आनंद घेऊ लागलो. काही क्षणाने तिने मला दूर केलं.

"इंद्रजित काय करतोयस.. तू इथे कसा आलास..?" ती मला दूर करत प्रश्न विचारू लागली.

मी शुद्धीवर येत बोलू लागलो, "मला माफ कर. मी एकदम घाबरून गेलो होतो. मला माफ कर."

"हो हो. पण तू इथे काय करतोयस.?"

"मी तुला भेटायला आलोय ?"

"का ?"

"मला तुला काहीतरी सांगायचं आहे." मी तिचा हात धरत बोलू लागलो.

"मला तू आवडतेस. प्रेम जडलंय माझं तुझ्यावर." मी मनात जे होतं ते पटकन बोलून मोकळा झालो.

ती गालात हसू लागली. बघता बघता ती जोरजोरात हसू लागली. मी तिला पाहतच राहिलो. हसत हसत ती समोरच्या एका दगडावर जाऊन बसली. मी सुद्धा तिच्या शेजारी जाऊन बसलो.

"काय झालं. इतकी का हसतेस. मी काही मस्करी करत नाहीये. खरंच मला तू खूप आवडली आहेस. इतकी की तुझा माग काढत मी ह्या खाडीपर्यंत आलोय." मी तिचा हात धरत बोलू लागलो.

"इंद्रजित प्रेम वगैरे काही नाही. तू का आलायस माहितीय ?"

"का ?" मी प्रश्नार्थक नजरेने विचारलं.

"हवस." तिने विषण्णपने पाहत उत्तर दिलं. "हवस निर्माण झाली आहे तुझ्या मनात म्हणून तू आला आहेस. तुझ्या डोळ्यातच ते दिसून येतंय."

"अशी का बोलतेस ?" मी एकदम गंभीर नजरेने पाहू लागलो.

तिचे निळे डोळे मला लालसर दिसू लागले. तिला पाहून मला भिती वाटू लागली.

"अशी का बोलतेस तू.. कोण आहेस तू.. भूत तर नाही ना..?" मी पटकन घाबरत उठलो.

ती हसू लागली. "नाही रे मी भूत नाही. इकडे माझ्याजवळ ये. तुला एक गोष्ट सांगते." तिने तिचा एक हात पुढे केला अन् मला जवळ बोलावलं. तिच्या प्रेमळ बोलण्याला मी भुललो अन् तिच्या शेजारी जाऊन बसलो. माझा हात हातात घेत ती बोलू लागली.

"तुला अहिल्येची गोष्ट माहित आहे ?" तिने माझा हात कुरवाळत विचारलं.

"नाही."

"बर मी सांगते. नीट लक्ष देऊन ऐक." तशी ती बोलू लागली.

"अहिल्या ही गौतम ऋषिंची पत्नी होती. गौतम ऋषिंपेक्षा वयाने फार लहान. एकदा स्वर्गाचा राजा, देवांचा देव इंद्राची नजर अहिल्येवर पडते अन् तो तिला मिळवू पाहतो. तिच्यासोबत समागमाची इच्छा व्यक्त करतो. तिला स्वर्गाच आमिष दाखवतो."

"पण अहिल्या त्याला नकार देते. मग इंद्र काय करतो माहितीये ?" तिने माझ्या घाऱ्या डोळ्यांत बघत विचारलं.

"काय ?"

"एकदा गौतम ऋषि नसताना इंद्र गौतम ऋषिंच्या वेषात येतो आणि अहिल्येसोबत समागम करतो. काही वेळाने गौतम ऋषि येतात. इंद्राच भांडं फुटतं. अहिल्येला तर यातलं काहीच माहित नसतं. ती चक्रावून जाते."

"मग इंद्र गौतम ऋषिंना सांगतो की तुमची पत्नी आता भ्रष्ट झाली आहे. तिला माझ्यासोबत पाठवा. इथे पर्णकुटीत तिचं सौंदर्य वाया घालवू नका. तिची जागा स्वर्गलोकांत आहे."

"पण गौतम ऋषि नकार देतात. अहिल्या पण नकार देते. ती रडू लागते. इंद्र निघून जातो. अहिल्या ऋषिंची माफी मागते. नकळत ही चूक तिच्या हातून घडली आहे ते सांगते. पण ऋषि फार रागात असतात. ते रागाच्या भरात तिला श्राप देतात की तू कातळ शिल्प बनून जगशील."

"ती एका दगडी पुतळ्यात परावर्तीत होते. अन् तेव्हापासून अहिल्या दगड बनून जीवन जगते. काही वेळाने मग ऋषिंचा राग शांत होतो आणि ते तिला उ:शाप देतात की, प्रभू श्रीरामांच्या चरणस्पर्शाने ती मुक्त होईल. परंतु तोपर्यंत ती दगडी शिल्प बनून जगते." एवढं बोलून ती शांत झाली.

"पण ही गोष्ट तू मला का सांगतेस. माझ्याशी काय संबंध ?" मी तिला गंभीर चेहऱ्याने विचारलं.

"सांगते ना. या गोष्टीत एक ट्विस्ट काय आहे माहितीये ?"

"काय ?"

"काही लोकं म्हणतात की, अहिल्येला आपण कोणासोबत समागम करत आहोत हे माहित होत तरी ती मुद्दाम इंद्राला परवानगी देते. तर काही लोकं म्हणतात इंद्राने अहिल्येला फसवून तिच्यासोबत समागम केल यात अहिल्येची काहीच चूक नाही."

"मग यातलं खरं काय आहे ?"

"खरं खोटं काहीही असूदे. मुद्दा तो नाहीच. मुद्दा हा आहे की दोन्ही परिस्थितीत अहिल्येला दगड बनून जीवन घालवावं लागलं. तिने मर्जीने समागम केलं तरी अन् तिला इंद्राने फसवलं तरी. का..?" तिने "का" म्हणताना जोरात माझ्या हातावर हात मारला.

"का, हे मी कसं सांगू शकतो.. मला तर ही गोष्ट पण माहित नव्हती. माझा काय संबंध.. तू का मला हे सगळं सांगतेय..?" तशी ती हसू लागली.

"हसू नकोस मला आता भिती वाटतेय."

तशी ती शांत झाली.

"मी सांगते का. कारण इंद्र हा पुरूष आहे. इंद्र हा देव आहे. इंद्र हा देवांचा राजा आहे. इंद्र हा स्वर्गाचा राजा आहे. त्याला सर्व काही माफ आहे. तो काहीही करू शकतो."

"उलट, अहिल्या एक स्त्री होती. गरीब होती. आणि गरीब स्त्रीयांवर कोणाचीही मर्जी चालते. कोणाचीही हुकूमत चालते."

"देवांना शिक्षा पण सोईच्या मिळतात अन् आम्हांला ? आम्ही काय एवढं चुकीचं केलं ? नकळत घडलेली चूक असो वा फसवणूक शिक्षा द्यायची तर समान द्यायची." तिचे निळसर डोळे एकदम लाल भडक होऊ लागले.

"हे बघ तू काय बोलतेस ते मला कळत नाही. तू ही गोष्ट मला का सांगतेस ते मला कळत नाहीये."

"कारण तू पण इंद्र आहेस इंद्रजित." ती एकदम मोठ्याने बोलू लागली. "तू पण पुरूष आहेस. तु पण अहंकारी आहेस. तू इथे आलास तो प्रेमापोटी नाही. तुझी हवस तुला इथे घेऊन आली."

"असं नाहिये. माझं खरंच प्रेम आहे."

"प्रेम. कसलं प्रेम. किती ओळखतोस मला. कधीपासून ओळखतोस. काय माहितीये तुला माझ्याबद्दल. सांग."

मी एकदम शांत झालो. मला तिच्याबद्दल काहीच माहित नव्हतं.

"नाही माहित ना. कसं माहित असणार. तू ओळखत नाहीस मला. मला पाहिल्यापासून तुझ्या नजरेत हवस निर्माण झाली आहे. तुला काय वाटलं मला ती दिसली नाही."

"काय बोलतेस तू.. काय झालंय तुला.. कोण आहेस तू..?" मी आता एकदम घाबरून गेलो होतो.

"अहिल्या. अहिल्या आहे मी."

मी डोळे मोठे करून तिला पाहत होतो. माझ्या थरथरत्या तोंडातून तुटक तुटक शब्द बाहेर पडू लागले, "रामायणातली ?"

ती विषण्णपणे हसली अन् म्हणाली, "हं ऽ ती अहिल्या भोळी होती. ती स्वत: दगड बनून जगली होती. मी भोळी नाही. मी कलियुगातली अहिल्या आहे." तसं म्हणत ती जोरजोरात हसू लागली.

हसता हसता तिने माझा हात धरला. मी तो सोडण्याचा प्रयत्न करू लागलो. पण माझ्याकडून तो सुटत नव्हता. मी घाबरून गेलो होतो. तिचे लालसर डोळे पाहून मला घाम फुटला होता.

ती तोंडात काहीतरी पुटपुटत होती अन् मला पाहून हसत होती. हळूहळू माझं अंग सैल पडत गेलं. माझे अवयव ढिले पडत गेले. रेतीचा किल्ला कोसळावा तसं माझं शरीर कोसळलं. माझ्या शरीराची माती माती झाली.

शरीर म्हणून काही जाणवत नव्हतंच. हलकं हलकं वाटत होतं. इतकं हलकं की वारा येताच धुळीसोबत वाहता येईल.

प्रेमानं मला मातीत मिळवलं. हवसेनं माझी माती केली.

००

शुद्ध आली तेव्हा नजरेसमोर मुर्त्याच मुर्त्या होत्या. मातीच्या. त्यातल्या बऱ्याच मुर्त्या जिवतं होत्या हे मला जाणवत होत. पण कोणी काहीच बोलत नव्हतं. जरी कोणी बोलत असेल तरी मला ते ऐकू येत नव्हत. माझं बोलणं कोणाला ऐकू जात नव्हतं. जसं समोर उभ्या असणाऱ्या गौतमला जात नाहियें.

मी त्याला कधीपासून हाका मारतोय पण तो माझी मूर्ती हातात घेऊन फक्त बघत बसलाय. उत्सुकतेने.

"अरे बघतोयस काय.. तो मीच आहे.. या चुडैलने मला मूर्तीत कैद केलं आहे. गौतम.. गौतम.."

काहीच फायदा नाही. माझा आवाज त्याच्यापर्यंत जातच नाही. उलट त्याच्या बोलण्याणेच माझे कान ठणकू लागलेत.

"काहीही म्हणा, पण जादू आहे तुमच्या हातात. अगदी हुबेहूब मूर्ती तयार केलीत माझ्या मित्राची."

"होय. पण आहे कुठे तुमचा मित्र. दोन दिवसांनी येतो म्हणाला होता. मी दिलेलं आरशातलं प्रेम पण तिकडेच आणि तोपण तिकडेच." तसे दोघे हसू लागले.

"काय माहित कुठे गायब झालाय. असाच आहे तो. न सांगताच जातो, आाणि गेला की आठ आठ दिवस येत नाही."

"घरचे काही बोलत नाहीत."

"काय बोलणार. पैसा कमावण्यापासून वेळ मिळेल तेव्हा लक्ष देतील ना मुलांकडे. बडे घर की औलाद आहे."

"म्हणजे तुमचा इंद्रजित स्वर्गाचा राजा आहे म्हणा." तसं त्या चुडैलनं या मुर्खाला टाळी दिली अन् दोघे गडगडाटी आवाजात हसू लागले.

मी फक्त पाहत राहिलो. माझ्या नजरेसमोर आरसा होता. अन् माझं मातीतलं रूप मी पाहत होतो. आरशातलं रूप हे इतरांना जे दिसतं ते असतं पण आपलं खरं रूप आपल्या अंत:करणात असतं. ते कोणाला दिसत नाही. ते फक्त आपणच पाहू शकतो.

योग्य वेळी ते बदललं तर ठिक नाही तर आयुष्याची माती होते.

# पाठीराखा

माझं ठाम मत आहे, जे डोळ्यांना दिसतं ते खरं. मग भूत असो वा देव. दिसला तरंच खरं.

देवाचा चमत्कार मी कधी अनुभवला नाही अन् भुताच्या भीतीने कधी घाबरलो नाही.

पण आताची परिस्थिती पूर्ण वेगळी होती. आता भीती वाटत होती. तसा मी कधी घाबरत नाही. पण आता या क्षणी भीतीने थरथरू लागलो होतो.

आज जेव्हा मी रात्रीच्या सव्वातीन वाजता पर्वतीच्या रस्त्याला उभा होतो, आयुष्यात पहिल्यांदा भितीने थरथरत होतो. अंगावर शहारा आला होता अन् श्वासोच्छ्वासाची शर्यत सुरू होती.

यापूर्वी मी इतका कधी घाबरलो नव्हतो पण या क्षणी  माझ्या समोरचं दृश्य मला घाबरवत होतं. मित्रांनी रंगवून सांगितलेल्या कहाण्या, लोकांनी अनुभवलेले प्रसंग मला घाबरवत होते.

पर्वतीचा रस्ता. निलगिरीच्या झाडांतून वाट काढत जाणारा एक भयाण रस्ता. रस्त्याच्या सभोवती उंचच्या उंच निलगिरीची झाडं अन् माणसाएवढं वाढलेल गवत.

चालताना आजूबाजूला पाहिलं की फक्त झाडीच दिसायचीत. दिवसा जरी चालत जायचं म्हटलं तरी रस्ता अंधूक दिसायचा. रात्रीची तर मग बातच और.

या रस्त्याच्या बाबतीत बऱ्याच अफवा होत्या. त्या खऱ्या की खोट्या हे मला माहित नव्हतं.

कित्येकांना इथे चित्रविचित्र भास झाले. तिथून चालताना असं जाणवायचं की कोणीतरी पिशाच्च त्यांच्या मागून चालत आहे. त्यांच्या पावलावर पाऊल टाकत आहे.

अंधारातसुद्धा एक गडद छाया कित्येकांनी पाहिली होती. कानाजवळ येणारा मंदसा आक्रोश कित्येकांनी ऐकला होता.

अशा भयाण रस्त्यासमोर मी हातात दोन बॅगा अन् खांद्यावर एक बॅग अडकवून उभा होतो.

त्याचं असं झालं की, मी नुकताच मुंबईवरून गावी आलो होतो. गाडी सुसाट आल्याने मी वेळेपूर्वीच पोहोचलो होतो.

स्टँडवरून मी वसतीगृहाच्या दिशेने चालत निघालो. रस्ता शांत होता. कोणाची लगबग नव्हती. दुकानं बंद होती. रस्त्यावरची जनावरं निपचित एका बाजूला झोपली होती.

हळूहळू चालत जाऊ लागलो तोच मला पुढे रस्त्याचं काम सुरू असल्याच दिसलं. मला काही कळेनासं झालं. इतक्या रात्री रस्ता बणवण्याचं काम सरकार का करत होत ? आज रात्रीचा दिवस त्यांच्यासाठी का उजाडला होता ?

मी जवळ पोहोचताच मला कळून चुकलं की आपण आता इथून जाऊ शकत नाही.

वसतीगृहापर्यंत पोहोचण्यासाठी दोन रस्ते होते. त्यातला एक रस्ता तर माझ्यासाठी बंद झाला होता. राहिला दुसरा रस्ता, म्हणजे पर्वतीचा रस्ता. मी बेधडकपणे त्या रस्त्याला वळालो.

नकळतपणे अतिआत्मविश्वास मला नडला. मी पर्वतीजवळ आलो आणि थांबलोच. समोरच भयाणक दृश्य पाहून माझे हातपाय लटलटू लागले. मला आता काय करावं ते कळत नव्हत.

मागे परत जाऊन तरी काही होणार नव्हतं. पर्वतीचा रस्ता सरळ मला वसतीगृहापर्यंत पोहोचवणार होता. पण आता मी घाबरत होतो. लोकांच्या कथा, मित्रांच्या कहाण्या कानात ऐकू येत होत्या.

काही क्षण मी तसाच थांबलो. स्वत:ची समजूत घातली. मनात धाडस एकवटलं अन् खाली मान घालून चालू लागलो. रस्ता ओळखीचा होता पण आता तो मनात धडकी भरवत होता.

पावसामुळे चिखलांनी माखलेल्या अन् जागोजागी पाणी साचून डबकं तयार झालेल्या निसरड्या रस्त्यावरून मी चालू लागलो. मनात फक्त एकच भिती होती लोकं जे बोलतात त्यातलं काही माझ्यासोबत नको होऊ दे.

पण म्हणतात ना, आपल्याला ज्या गोष्टीची भिती असते नेमकी तिच आपल्यासोबत घडते. मी सुद्धा या गोष्टीला बळी पडलो.

चालता चालता मला असं जाणवू लागलं की माझ्या मागे कोणीतरी चालत आहे. अंगावर काटा आला अन् माझं काळीज जोरजोरात धडकू लागल.

अंग घामाघूम झालं. शरीर सुन्न पडलं. मी जागीच थांबलो. मी थांबताच माझ्या मागे कोणीतरी थांबल्याचं मला जाणवलं.

बारीकसा आवाज कानी ऐकू येऊ लागला. कसला आवाज होता माहित नाही. माझे कान सुन्न झाले होते. भीतीने मला काहीच कळत नव्हतं.

मी कसंबसं बळ एकवटलं अन् पुन्हा चालू लागलो तोच मला एक गडद सावली माझ्या मागे हलल्याच मी पाहिलं. माझ्या अंगावर सरसरून काटा आला.

लोकं म्हणतात ते खरं होतं. पर्वतीचा रस्ता पछाडलेला होता. अन् आता या रस्त्याचा मी शिकार झालो होतो. इथल्या पिशाच्चांना मी बळी पडणार होतो.

माझं अंग गळून पडलं. आता माझं काही खरं नव्हतं.

माझं ठाम मत होत जे डोळयांना दिसत त्यावर आपण विश्वास ठेवायचा. या क्षणी पिशाच्चांचा मला अनुभव आला होता. मला कळून चुकलं होतं की भूतं असतात. अन् आता हे लोकांना सांगायला, मित्रांना सांगायला मी जिवंत राहणार नव्हतो.

पर्वतीच्या रस्त्यावर येऊन मी घोडचूक केली होती. आता माझं काही खरं नव्हतं.

मी हळूहळू चालू लागलो. ती सावली माझ्या मागे होती. कानाजवळ काहीतरी अस्पष्ट आवाज येत होता पण काही कळत नव्हतं.

मान खाली घालून चालू लागलो. माझं अंग ढिल्ल पडलं होतं. दोन्ही हातात दोन बॅगा होत्या. खांद्यावर एक बॅग अडकवली होती. खरं मला त्यांच वजन जाणवत नव्हत.

मागे जी सावली होती तिचं ओझ माझ्या मनावरून उतरत नव्हतं. खाली मान घालून चालता चालता जी अदृश्य छाया मला दिसत होती तिची भिती मनात बसली होती.

वातावरणातली भयानता यापूर्वी मी कधी अनुभवली नव्हती. एक भयाण आवाज एका कानात ठिय्या मारून बसला होता अन् एका कानात एक अस्पष्ट आवाज येत होता.

एका कानात भीती भरवणारा आवाज होता तर एका कानात अस्पष्ट आवाज ऐकू येत होता.

जमिनीवर दोन सावल्या स्पष्ट दिसत होत्या. त्या सावल्या बघत बघतच मी चालू लागलो.

चालता चालता अचानक उजेड आला अन् मी समोर पाहिलं. मी वसतीगृहाजवळ पोहोचलो होतो. मी थक्क होतो. पर्वतीचा रस्ता मी कसा काय पूर्ण करून इथपर्यंत आलो ते मला कळत नव्हतं.

अंग शहारून आलं. धडधड वाढली. हातातल्या बॅगा खाली पडल्या अन् माझा एक हात माझ्या हृदयाजवळ आला. ढगानं गडगडावं तसं ह्दय जोरजोरात धडधडत होतं. मी हळूहळू मागे फिरलो.

पर्वतीचा रस्ता संपला होता. त्या भयाण अंध:कारातून मी बाहेर पडलो होतो. माझा माझ्यावर विश्वास बसत नव्हता.

वसतीगृहात आलो. माझ्या खोलीत शिरलो. माझं अंग घामाने भिजलं होतं. मी तसाच अंथरूणात शिरलो. मनात भिती ठेवून तसाच निजलो.

मित्रांच्या गोंगाटाने सकाळी झोपमोड झाली. झोपेत असल्यामुळे मला नीट्स काही कळत नव्हतं. कानावर फक्त पालखी, स्वामी, मुख्यमंत्री असे तुटक शब्द पडत होते.

दिवसभर फक्त अंथरूण धरून बसलो होतो. रात्री जे काही अनुभवलं ते कोणाला सांगायची हिंमत होत नव्हती. काहीच करू वाटत नव्हत. बोलू वाटत नव्हतं. बाहेर जाऊ वाटत नव्हतं.  काही खाऊ वाटत नव्हतं. फक्त निपचित पडून होतो.

रात्री, शेवटी माझ्या मित्राने मला येऊन विचारलंच, "भावा दिवसभर अंथरून धरलंय काय झालंय ?"

मी "काही नाही" असं मान डोलावून सांगितलं.

"चल मठात जाऊ. आज तिथंच जेवायचंय आपल्याला.  दर्शन घेऊ आणि महाप्रसादाला पण बसू."

"का मेस बंद आहे ?"

"होय."

"आज काय कार्यक्रम होता का ? एवढा दंगा कसला चाललेला ?"

"आता अंथरूणातून बाहेर येशील तेव्हा तुला कळेल ना." माझा मित्र दात विचकावत बोलू लागला, "मुख्यमंत्री आलेला मठात. दिवसभर कार्यक्रम सुरू आहेत. तिकडच होतो आम्ही."

इतक्या रात्री रस्त्याच काम सरकार स्वत:साठी करत होत हे मला कळून चुकलं. मी तोंड वाकड करत म्हणालो, "नको जा तू.. तसं पण मला भूक नाही."

"ए नास्तिका, देवासाठी म्हणून नाही पण पोटासाठी म्हणून तर चल. सकाळी पण काही खाल्लं नाहीस आता पण नको बोलतोयस. काकींना सांगू का फोन करून. दिवसभर लोळत पडला आहेस म्हणून." माझा मित्र मला दम देत बोलू लागला.

"बर चल." आईची धमकी देताच मी उठलो. नाही म्हटलं तरी पोटात आता गुडगुड व्हायला सुरवात झाली होती.

फ्रेश होऊन काही वेळातच आम्ही मठात पोहोचलो. मठ चांगला सजवला होता. लोकांची भरपूर गर्दी होती. लोकं आस्थेने, श्रद्धेने स्वामींच्या मूर्तीचं दर्शन घेत होते.

मी आणि मित्र रांगेत उभे राहिलो. हळूहळू रांग पुढे सरकली. मी मूर्तीजवळ जाऊन उभा राहिलो.

देवाच्या कधी पाया पडलो नव्हतो. कारण माझं ठाम मत होत जे डोळ्यांना दिसतं त्यावरचं विश्वास ठेवायचा.

मी मूर्तीच निरिक्षण करू लागलो. माझ्या कानात मंदसा आवाज गुंजू लागला. हा तोच आवाज होता जो रात्री माझ्या एका कानात अस्पष्टपणे ऐकू येत होता.

माझी नजर मूर्तीच्या दिशेने गेली. स्वामींच्या डोळ्यात माझे डोळे एकरूप झाले. मूर्तीच्या मागे लिहिलेली अक्षरं, कानात स्पष्ट ऐकू येऊ लागली, "भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे."

माझ्या अंगावर काटा आला होता. डोळ्यात पाणी आलं होतं. माझ्या मित्राने धक्का देत मला पुढे ढकललं.

"एवढं काय निरिक्षण करतोयस मूर्तीच, देवाला मानायला लागलास की काय..?"

मी काहीच बोललो नाही. मी फक्त मूर्ती पाहू लागलो.

माझी नजर स्वामींच्या मूर्तीवर गेली. मूर्तीवर आलेलं बारीक हसू माझ्या नजरेने टिपलं. अनावधानाने माझे हात जोडले गेले.

माझ्या मनातली भिती निघून गेली होती. दडपन कमी झालं होत. अंगातला ताप नाहिसा झाला होता. मनात नवचैतन्य निर्माण झालं होत. चेहरा उल्हासित झाला होता.

मला पाहून माझा मित्र बोलू लागला, "देवाचं दर्शन घेतल्यापासून खुललायस.. देवबिव मानायला लागलास की काय..?"

मी  हसऱ्या चेहऱ्याने म्हणालो, "माझं ठाम मत आहे, माझ्या डोळ्यांना जे दिसणार मी फक्त त्यावरच विश्वास ठेवणार..  मग ते देव असो वा भूत.." तसं म्हणत मी हसू लागलो.

माझा मित्र मान हलवत पुटपुटला, "सुधारणार नाहीस."

माझ्यासोबत काय झालं हे मला कळालंच नाही. रात्री खरंच माझ्या मागे भूत होतं का..? अन् होत तर माझी रक्षा करणारा कोणी, पाठीराखा पण माझ्या सोबत होता का ? तो अस्पष्ट ऐकू येणारा आवाज, आता मंदिरात स्पष्ट ऐकू येऊ लागला होता. हाच तो आवाज होता का..?

की मला आलेला अनुभव हा फक्त एक भास होता..? जर भास होता तर मग तो नेमका कोणता भास होता..?

भीतीचा की देवाचा ?

०००० 

## आरशातलं प्रेम पुस्तकातून..

एकोणीस नंबरच्या रूमसमोर उभा होतो. या रूमचं या वसतीगृहात काय रहस्य आहे तेच मला कळत नव्हतं.

इथे आल्यापासून सतत गुलाबाचा वास मला येत होता. संपूर्ण वसतिगृह मी पालथं घातलं. एक अन् एक खोली, तिथला परिसर तपासून पाहिला पण मला गुलाबाचं झाड तर सोडाच पण साधी पाकळीसुद्धा दिसली नव्हती.

पण या रूमजवळ येताच तो वास तीव्रतेने येत होता. अन् फक्त मलाच येत होता. अमोल, स्वप्निल, सागर यांनाच काय बाकी इतर मित्रांना देखील कुठलाच असा वास येत नव्हता. मग मलाच का ?

या रूमबद्दल, या वसतिगृहाबद्दल बऱ्याच अफवा माझ्या कानावर आल्या होत्या. त्या कितपत खऱ्या-खोट्या मला माहित नाही. इथं असणाऱ्या भूतांच्या अफवांवर मला विश्वास नव्हता. कारण अजून तसा कोणताच अनुभव मला आला नव्हता.

या रूममध्ये काय आहे ते आता मी पाहणार होतो. गेल्या बऱ्याच दिवसांपासून मी ती संधी शोधत होतो. अन् आज ती मिळाली.

कॉलेजला सलग चार दिवसांच्या सुट्टया पडल्या आहेत. संपूर्ण वसतीगृह रिकामं आहे. आता मला कोणी अडवू शकणार नाही.

मी दाराच्या आणखी जवळ गेलो तोच वातावरणात बदल होऊ लागला. पक्षांचा किलकिलाट वाढला. वारा जोरात वाहू लागला. मी मागे वळून वसतीगृहाचा परिसर पाहू लागलो.

माझ्यासमोर संपूर्ण वसतीगृह एखाद्या भयाण जंगलाप्रमाणे दिसत होतं. चारही बाजूला जंगल अन् मध्ये वस्ती करून राहिलेलो मी असंच ते चित्र होतं.

आकाशाचा रंग काळसर होत चाललेला. पक्षी आपआपल्या घरट्याकडे ओढीने थवा करून जात होते. नारळाच्या झावळया कुणीतरी गुदगुल्या कराव्या अशा हलत होत्या. वारा जोरात वाहू लागला होता. क्षणभरासाठी मला त्या वातावरणाची भितीच वाटली.

असं वातावरण यापूर्वी कधी वसतीगृहात झालं नव्हतं. रातकिड्याचा आवाज मधूनच वाढू लागला. मधूनच थांबू लागला. दुरून कुठून तरी कोणीतरी हाक मारत असल्यासारखं वाटू लागलं. माझ्या मागे कोणीतरी उभं आहे असं जाणवू लागलं.

क्षणात माझ्या अंगावर काटाच आला. अचानकच भिती वाटू लागली. ज्या ठिकाणी मी उभा होतो, तिथे कोणीतरी आणखी असल्याचं सतत जाणवू लागल. मी गोल गोल फिरून सगळीकडे नजर फिरवली. खर कोणीच दिसलं नाही.

तिथून निघण्याचा विचार माझ्या मनात आला. पण मी भित्रा नव्हतो. मला या रूमचं रहस्य, इथं झालेल्या आत्महत्येचं रहस्य, इथल्या भूताचं रहस्य जाणूनच घ्यायचं होतं. अन् आता काहीही झालं तरी मी घाबरणार नव्हतो.

मी मन शांत करून रूमच्या दिशेनं पाऊल टाकलं. दोन तीन पावलं चालून एकोणीस नंबरच्या रूमजवळ येताच दारासमोरच्या खांबावरली लाईट गेली. अन् मी जाग्यावरच भीतीने थांबलो. माझी धडधड वाढली. अंगावर शहारा आला. मी भीतीनं एक आवंढा गिळला. आवाज हळूहळू वाढत होता. कोणीतरी हाक मारत असल्यासारखं सतत वाटत होतं. सुगंध इतका येत होता की एखाद्या गुलाबाच्या बागेतच आहोत की काय असंच वाटत होत.

माझ्या कपाळावर घर्मबिंदू उमटले होते. मी क्षण दोन क्षण तसाच समोर बघत उभा होतो. हॉस्टेलच्या तिनही कोपऱ्यातल्या खांबावर लाईट सुरू होत्या. फक्त एकोणीस नंबर समोरचीच लाईट अचानक का गेली तेच कळत नव्हतं.

भीती वाढत होती. पण या खोलीत नेमकं काय असेल याची उत्सुकता काही कमी होत नव्हती. मी आणखी एक पाऊल पुढे टाकलं. तोच वारा आणखी जोरात वाहू लागला. खाली पडलेला पालापाचोळा उडू लागला.

वाऱ्याने उडत उडत एका वर्तमानपत्राचं पान माझ्या अंगावर आलं. मी ते झटकलं. ते वर्तमानपत्र खाली पडताच माझी नजर त्यावरील बातमीवर खिळून राहिली.

"महाराष्ट्रातल्या लहान मुलांना चोरतंय तरी कोण ? कुठं हरवल्या जातायत मुंबईतल्या मुली ? एनसीआरबीचा अहवाल सांगतोय तरी काय ?"

अपहरणाची बातमी वाचताच मी तो पेपर हातात घेतला. ती बातमी पूर्ण वाचून काढली.

मुंबईसोबतच महाराष्ट्रात होणाऱ्या लहान मुलींच्या अपहरणाची ती बातमी होती. एनसीआरबीने प्रकाशित केलेला एक अहवाल आणि त्यातील महाराष्ट्रातील अपहरणांची आकडेवारी होती.

मी ते वाचून थक्क होतो. मी हे समजू शकत होतो. कारण माझी अंकिता पण अशीच बेपत्ता झाली होती. लोकं म्हणतात ती वारली. तिला कोणी तरी मारलं. पण माझा त्यावर विश्वास नव्हता.

पोलिसांनी दिलेलं प्रेत हे अंकिताचं नव्हतं. नक्कीच त्यात काही तरी घोळ होता. माझं मन मला सांगतय. माझी अंकिता जिवंत आहे. मी तिला नक्कीच शोधून काढेन.

अंकिताच्या विचाराने माझं मन हळहळलं. त्या वर्तमानपत्राचं अर्धफाटकं पान मी घडी घालून खिशात ठेवलं. माझी नजर पुन्हा एकोणीस

नंबरच्या दारावर गेली. अंकिताचा विचार मनात येताच, त्या गुलाबाचा वास आणखी तीव्र झाला.

माझ्या मनातली भिती घालवली अन् मी दारावरचं कुलूप तोडलं. दार आत ढकललं अन् पाहतच राहिलो.

समोरचं चित्र पाहून मी थक्क होतो. माझ्या आजूबाजूच्या वातावरणात मी राहिलोच नव्हतो. फक्त अंधार पसरला होता. अन् त्या अंधारात चंद्राची एक किरण तुटलेल्या कौलावरून जमीनीवर येत होती. अन् त्या चंद्रकिरणांच्या मधोमध एक कपाट होतं.

त्या कपाटाला आरसा होता. त्या आरशात मी पाहतच राहिलो. मला माझ्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. हे खरं की खोटं ते कळत नव्हतं. मी जागा आहे की स्वप्नात आहे ते कळत नव्हत.

अंगावर शहारा आला होता. हृदयाची धडधड वाढली होती. डोळ्यात पाणी ठेवून मी फक्त माझं आरशातलं प्रेम पाहत होतो.

आरशातलं प्रेम.. बाल वयात सुरू झालेलं माझं बालिश प्रेम.. तरूण वयात व्यक्त होण्यापूर्वीच दुरावून गेलेलं माझं पहिलं प्रेम..

गुलाबाच्या काट्यांनी जखडलेलं माझं "आरशातलं प्रेम."

****

# प्रकाशित साहित्य

## ई-साहित्य प्रतिष्ठानवर उपलब्ध




सखी




अदृश्य वेदना

## ॲमेझॉनवर उपलब्ध




आरशातलं प्रेम




अधुरी कहाणी




अदृश्य बाप